नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपेकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

र्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

जून
१९६२

★

...या ५० न. पैसे

या अंकात

* प्रा. श्री. के. क्षीरसागर
* माणिक भोयर
* सौ. कान्ता रहाटगांवकर
* मुकुंद बुटी
* कुसुमानंद
* प्रा. श्री. मा. कुलकर्णी
* प्रा. भास्कर कविमंडन

शिवाय, संपादकीय,
परिचय-परामर्श इ०

संपादकः- प्रा. श्री. मा. कुलकर्णी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र--

:: संपादक मंडळ ::
भा. श्री. परांजपे
व. कृ. वऱ्हाडपांडे
मा. गो. वैद्य

युगवाणी

संपादकः--श्री. मा. कुलकर्णी

वर्ष १७] जून १९६२ [अंक २

अनुक्रमणिका

क्रमांक	विषय	पृष्ठ
१	संपादकीय	२
२	आधुनिक साहित्याचे त्रिनेत्र	५
३	जखम (कविता)	१७
४	माझ्या दुबळ्या भावात ,,	१७
५	अजुनी स्मरती	१८
६	होम	१८
७	महाकवीची कविता	१९
८	भेट अशांची व्हावी	२९
९	परिचय परामर्श	
	दक्षिण दर्शन	३३
	गुरुदेव रवींद्रनाथ टागोर	३४

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय

'काव्य रत्नावली'कार श्री. फडणीस

१८८७ च्या जून महिन्यात 'काव्यरत्नावली' या नावाने केवळ कवितेला वाहिलेले मासिक काढून ज्यांनी नियतकालिकांच्या इतिहासात एक नवे पान लिहिले व प्रतिकूल परिस्थितीतहि ते दीर्घकाळपर्यंत चालवून मराठी काव्याची ज्यांनी फार मोठी सेवा केली, त्या कै. नारायण नरसिंह उर्फ नानासाहेब फडणीस यांच्या जन्मास दि. ७ जून १९६२ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. काव्य वाङ्मयाच्या सेवेला नानासाहेबांनी स्वतःला वाहून घेतले व आमरण ती सेवा निरलसपणे, निरपेक्षपणे व त्यागपूर्वक केली. १८८७ ते १९३५ या दीर्घ काला-वधीत त्यांनी दीडलाखावर कविता प्रकाशित केली व सुमारे २५० कवींना उजेडात आणले. पक्ष, पंथ, संप्रदाय, मत अगर मंडळ या सर्वांपासून अलिप्त राहून सर्वांना काव्यरत्नावलीत एकत्र ओवण्याचे कार्य नानासाहेबांनी केले व महाजनी, आगाशे, कानिटकर, लोंढे, मोगरे, केशवसुत, टिळक, चंद्रशेखर, तांबे, बालकवि, सुमंत, नागेश, टेकाडे, बेहरे, खापर्डे, बी, माधव ज्यूलियन, यशवंत, गिरीश, केशव कुमार इ. तीन पिढयातील कवींच्या काव्याचा आदर केला व ते रसिकांना सादर केले.

थोरांची काव्यविषयक मते मागवून ती रसिकांच्यापुढे मांडणे, कविजनांची चरित्रे प्रकाशित करणे, कवि सम्मेलन भरविणे इ. विविध प्रकारे कै. नाना-साहेबांनी मराठी काव्याची सेवा केली आहे. या शिवाय त्यांनी स्वतः विपुल काव्यरचनाहि केलेली आहे. 'अलंकार शिवभूषण,' 'सुभाषित मराठी', 'महाभारत भाव' ही त्यांची पुस्तकेहि प्रसिद्ध आहेत.

अशा या थोर काव्यभक्ताची व काव्यसेवकाची जन्मशताब्दि महाराष्ट्रातील सर्व साहित्य संस्थांनी व नियत कालिकांनी साजरी करावी हे उचितच नव्हे तर आवश्यकहि आहे.

आम्ही या प्रसंगी कै. नानासाहेब फडणीस यांना आदरांजलि अर्पण करतो व त्यांची काव्यसेवा अनेकांना स्फूर्तिप्रद व मार्गदर्शक ठरो अशी इच्छा करतो.

महाकाव्य न लिहिलेला महाकवि

स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी दि. २८ मे ला ८० व्या वर्षात पदार्पण केले ही फार आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे. श्री. सावरकर हे या युगातील

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एक महापुरुष आहेत. त्यांचे देशप्रेम, त्यांची ध्येयनिष्ठा, त्यांचे धैर्य, त्यांचा त्याग, त्यांची प्रज्ञा, त्यांची प्रतिभा सर्वत्र अलौकिक व अद्वितीय आहे.

आधुनिक काव्याचा अभ्यास करताना प्रत्येक कर्वीच्या कवितेचे राष्ट्रीय, सामाजिक, निसर्गपर इ. प्रकारे वर्गीकरण करण्याची पद्धति आहे. परंतु खऱ्या अर्थाने ज्याला राष्ट्रीय म्हणता येईल असे जिवंत व ज्वलंत काव्य हे फक्त सावरकरांचेच होय. आपल्याकडे राष्ट्रप्रेम व देशप्रेम प्राचीन काळी नव्हते असे नव्हे. तथापि आधुनिक काळात देशप्रेमाचे कांही एक नवे रूप, विशेषत: इंग्लंडादि पाश्चात्य देशात दिसून येते. त्या तोलाचे व त्या मोलाचे पण त्यात भक्तीची भावना मिसळलेले असे देशप्रेम, मातृभूमिप्रेम, हे प्रकर्षाने सावरकरांच्या हृदयात, जीवनात, व काव्यात दिसते.

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या सर्व शक्तीं प्रमाणेच कवित्वशक्तीहि मातृभूमीला वाहिलेली होती व आहे. त्यांच्या कवित्वशक्तीने सदैव त्यांची साथ केली. कोणत्याहि परिस्थितीत तिने त्यांचा अगर त्यांनी तिचा त्याग केला नाही. कोमल व कठोर, सौम्य व उग्र अशा द्विविध रूपात ती वावरली आहे, अवतरली आहे. उत्कट व ज्वलंत भावनांचा प्रभावी आविष्कार असे सावरकरांच्या कवितेचे स्वरुप आहे. रूढ अर्थाने ज्याला महाकाव्य म्हणता येईल असे काव्य जरी सावरकरांच्या हातून लिहून झाले नाही तरी त्यांची प्रतिभा एका महाकवीची प्रतिभा आहे याची साक्ष त्यांच्या अनेक कविता देतील. त्यांची कविता 'महाकाव्य' नसली तरी 'महान् काव्य' आहे.

काव्या प्रमाणेच सावरकरांच्या प्रतिभेने नाटक, कादंबरी, निबंध, प्रबंध, चरित्र-आत्मचरित्र इ. अनेक क्षेत्रात संचार केला आहे व त्या त्या क्षेत्राला आपल्या दिव्यत्वाने उजळले आहे. भाषाशुद्धीची त्यांनी मोहीम सुरू केली व अनेक 'परकीय' शब्दांना स्थानभ्रष्ट करून त्या ठिकाणी स्वकीय शब्दांना स्थानापन्न केले. भाषाशुद्धि प्रमाणेच लिपिसुधारणेचेहि कार्य त्यांनी केले. अशा विविध रीतीने सावरकरांनी मराठी भाषेची व वाङ्मयाची सेवा केलेली आहे व तीहि त्यांच्या देशसेवे प्रमाणेच चिरंतन व चिरस्मरणीय आहे.

महाकाव्य न लिहिलेल्या या महाकवीला आम्ही नम्रतापूर्वक अभिवादन करतो व त्यांना दीर्घायुरारोग्य प्राप्त होऊन त्यांचे पार्थिव अस्तित्व भारतीयांना दीर्घकाल स्फुरणदायी ठरो अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करतो.

साहित्यिकांना विनंति

'युगवाणी' सारख्या एका साहित्यसंस्थेच्या मुखपत्राचा 'साहित्यसंसार' हा सर्वस्वी साहित्यिकांच्या सहायावर व सहकार्यावर अवलंबून असतो. 'साहित्य-

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संस्थेचे मुखपत्र' हे इतर नियतकालिकाहून सर्वस्वी भिन्न परिस्थितीत कार्य करीत असते. अनेक प्रकारच्या मर्यादा त्याला पडतात व पाळाव्या लागतात. धंदा किंवा व्यवसाय म्हणून ते सुरु झालेले नसते आणि म्हणून त्याला धंद्याच्या क्षेत्रात-स्पर्धेच्या हाटात- उतरता येत नाही. सर्व-सामान्य वाचक-ग्राहकांची मने आकर्षून घेण्यासाठी त्याला कसलाहि प्रयत्न करता येत नाही व करायचा असत नाही. अशा सर्व गोष्टी ध्यानात घेऊन साहित्यिकांनी कोणत्याहि साहित्यसंस्थेच्या मुखपत्राकडे पाहिले पाहिजे व इतर नियतकालिकांशी असलेल्या व्यावहारिक संबंधाहून वेगळे जिव्हाळयाचे संबंध त्याच्याशी प्रस्थापित केले पाहिजेत. लेखकाला त्याच्या लेखनाबदल मोबदला मिळावा की न मिळावा या वादात वा चर्चेत मी येथे शिरू इच्छीत नाही. परंतु साहित्यसंस्थांची एकंदर परिस्थिति विचारात घेत आजघटकेला तरी अशा मुखपत्राकडून तशा मोबदल्याची अपेक्षा साहित्यिकांनी करणे इष्ट होणार नाही एवढे अवश्य म्हणू इच्छितो. आज आपल्या देशात तरी सर्वस्वी लेखनावर उपजीविका अवलंबून असणारे साहित्यिक फारच थोडे आहेत. इतर बहुसंख्य लेखकांनी तरी साहित्यसंस्थांच्या मुखपत्रांना निरपेक्षपणे लेखन सहाय केले पाहिजे. तरच ही 'मुखपत्रे' फुलू-फळू शकतात

'युगवाणी' हे जर विदर्भाचे–महाराष्ट्राच्या या पूर्वभागाचे–प्रातिनिधिक मासिक व्हायचे असेल व त्याचा साहित्यिक दर्जा उत्तरोत्तर वाढावयाचा असेल तर सर्व साहित्यिकांनी–विशेषत: विदर्भस्थ साहित्यिकांनी–आपले सर्वप्रकारचे उत्तमातील उत्तम लिखाण 'युगवाणी' कडे आस्थेने, आपुलकीने, व अनाहूतपणे पाठविले पाहिजे. 'युगवाणी'चा साहित्यिक योगक्षेम चालविणे साहित्यिकांना आपले पवित्र कर्तव्य वाटले पाहिजे. नाहीतरी हे सारस्वताचे झाड त्यांनीच लाविलेले आहे तेव्हां त्यांनीच त्याकडे लक्ष पुरवून आणि त्यावर साहित्यामृताचे सिंचन करून त्याची वाढ केली पाहिजे.

'युगवाणी' विषयीच्या कळकळीनेच मी हे लिहिले आहे. साहित्यिकांना केलेला हा उपदेश नव्हे, ही सलगीची विनवणी आहे. साहित्यिकांचे ईश्वर जे ज्ञानेश्वरमहाराज त्यांच्याच शब्दात किंचित् बदल करून मी साहित्यिकांना नम्रपणे म्हणू इच्छितो की–

हे सारस्वताचे गोड । तुम्हीचि लाविले जी झाड
तरि साहित्यामृते वाड । सिंपोनि कीजो

–श्री. मा. कुलकर्णी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आधुनिक साहित्याचे त्रिनेत्र
१: सौंदर्यवाद (रोमँटिसिझम्)

प्रा. श्री. के. क्षीरसागर

[विदर्भसाहित्य संघाच्या विद्यमाने प्रा. श्री. के. क्षीरसागर यांनी जानेवारी १९६२ मध्ये गुंफलेल्या व्याख्यान मालेतील पहिले व्याख्यान.]

साहित्याचा विचार दोन तऱ्हांनी करणे शक्य आहे. साहित्याचा वाचकाच्या मनावर कोणता परिणाम होतो ह्याचा विचार हा अेक आणि साहित्य लिहीत असतानाची लेखकाची भूमिका कोणती, हा दुसरा विचार. सामान्यतः आपल्या कडील काय की पाश्चात्य काय, साहित्यमीमांसेत पहिल्या प्रकारचा विचारच अधिक आढळतो. दुसऱ्या प्रकारचा म्हणजे लेखकाच्या भूमिकेचा विचार अगदी अलिकडे होऊ लागला. ह्याचे कारण कदाचित् असे असू शकेल की साहित्यात लेखकाच्या व्यक्तिमत्वाला आणि वैयक्तिक अनुभवांना प्राधान्य देण्याची प्रवृत्ति आधुनिक काळात अधिक वाढली. कारण कोणतेहि असो, साहित्य ही पूर्ण अथवा तयार वस्तू मानून तिच्या घटकांचा, गुणांचा आणि दोषांचा विचार केला, म्हणजे साहित्यविचार झाला अशी कल्पना जुन्या साहित्यचर्चेत प्रामुख्याने दिसून येते ही गोष्ट खोटी नाही. परन्तु आपल्यासमोर असलेल्या साहित्याचा विचार कितीहि सूक्ष्मपणे केला तरी ते निर्माण करणाऱ्या व्यक्तिमत्वाचा विचार केल्या-खेरीज साहित्यविचार फारसा खोल जाणार नाही ही कल्पना पाश्चात्य देशात काय की भारतात काय फारशी प्रचलित नव्हती. ह्या अर्थाने, "लेखकाच्या भूमिकेचा विचार करण्याची पद्धति ही सर्वस्वी आधुनिक होय" असे म्हणता येईल.

एकाच प्रसंगाचे अथवा वस्तूचे चित्रण करताना लेखक दोन भिन्न भूमिकांवर असू शकेल. एक भूमिका स्वतःच्या सुखदुःखांनी भारावलेली अथवा आत्मनिष्ठ असू शकेल. तर दुसरी भूमिका सुखःदुख निरपेक्ष म्हणजेच आत्मनिरपेक्ष असू शकेल. तिला वस्तूनिष्ठ भूमिका असे म्हणता येईल. लेखनातील या दोन भूमिका नवीन आहेत असे नव्हे. कारण प्राचीन काळापासून आत्मनिष्ठ आणि वस्तूनिष्ठ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या दोन्हीहि प्रकारचे लेखन झालेले आहे. वेगळी परिभाषा वापरून हेच सांगायचे झाले तर भावगीतात्मक आणि कथानकपर अशा दोन्हीहि प्रकारचे लेखन प्राचीन काळीहि होते. पण असे असूनहि त्याचा विचार करताना मात्र ती दोन्हीहि लिखाणे पूर्ण वस्तु किंवा Finished product समजून त्यांचा विचार होई. शाकुंतल नाटक घेतले तरीहि त्यातील अलंकारांचा, रसाचा व ध्वनीचा विचार करायचा आणि 'मेघदूत' किंवा "भामिनीविलास" घेतले तरी पुन्हा त्याच गोष्टींचा विचार करावयाचा, अशी जुन्या साहित्यशास्त्रात स्थिति होती. तुकारामाच्या अभंगाचा विचार करताना जे निकष लावावयाचे, तेच मोरोपंताच्या आर्या-भारताचा विचार करताना लावायचे. शेक्सपिअरच्या नाटकांचा विचार करताना ज्या वाङमयीन गुणांचा विचार करावयाचा व जे वाङमयीन प्रश्न विचारावयाचे. तेच वाङमयीन प्रश्न शेक्सपिअरच्या सुनीतांचा विचार करतानाहि विचारावयाचे, कारण वाङमय म्हणजे इथून तिथून एक; वाङमय म्हणजे लेखकाने शब्दाच्या सहाय्याने केलेली कांहीतरी करामत – की जी तो मर्जीप्रमाणे हव्या त्या वाङमय-प्रकारात करू शकेल, अशी जुनी कल्पना होती. वृत्त निवडणे हा जसा लेखकाच्या मर्जीचा प्रकार (वास्तविक तोहि केवळ मर्जीचा भाग नव्हे) तसाच सुनीत लिहिणे, गझल लिहिणे, अभंग लिहणे किंवा आर्या भारतासारखे दीर्घ काव्य लिहिणे हा केवळ लेखकाच्या मर्जीचा भाग आहे अशी कल्पना होती. वाङमयाचे वेगवेगळे प्रकार लेखकांच्या त्या त्या वेळच्या भूमिकेवर अवलंबून असतात ही कल्पनाच नव्हती, असे जरी नाही, तरी वाङमयाच्या मीमांसेत या कल्पनेचा फारसा अुपयोग केलेला दिसत नाही. अर्वाचीन पाश्चात्य वाङमयात Subjective आणि Objective हा भेद केला जाऊ लागला, तेव्हांपासून या भेदाचा विचार होऊ लागला असे म्हणता येईल.

पाश्चात्य साहित्यमीमांसेत ॲरिस्टॉटल (ख्रिस्तपूर्व ३८४ ते ३२२) आणि लाँजायनस् (   ) ही दोन नावे म्हणजे त्या क्षेत्रातील महामुनींची नांवे समजली जातात. साहित्याच्या मीमांसेत त्यांनी ज्या गमकांचा विचार केला त्यात कांही मूलभूत भेद दिसून येई. ॲरिस्टॉटलने साहित्याच्या श्रेष्ठतेच्या विचारापेक्षा त्याच्या व्यवच्छेदक लक्षणांचा विचार अधिक केला आहे. 'साहित्य म्हणजे लोकव्यवहाराची * प्रतिकृति होय' असे त्याने ठरविले. लाँजायनस् याने काव्याच्या परिणामाचा व श्रेष्ठतेचा विचार मुख्यत्वेकरून केला. हृदयस्पर्शित्व, उत्कटता आणि उदात्तता ही त्याने काव्याच्या अथवा

* Epic poetry, tragedy, comedy,..............all these are in the most general view of them, imitations.

—Poetics.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्याच्या श्रेष्ठतेची गमके ठरविली. या दोन प्राचीन टीकाकारांच्या वाङमय-विषयक दृष्टिकोनात मूलभूत भेद आहे, हे उघड आहे. इतकेच नव्हे तर त्यांच्या वाङमयविषयक शोधाची दिशाच भिन्न आहे असे दिसून येईल. एकजण, 'वाङमय म्हणजे काय?' याचा विचार करीत आहे तर दुसरा 'वाङमयाचा मनावर परिणाम काय होतो आणि श्रेष्ठ वाङमयाचा मनावर परिणाम कोणता व्हावा ? ह्याचा विचार करीत आहे. एवढया दृष्टीने दोघांची दिशा भिन्न असली, तरी आधुनिक वाङमयविचारात जो प्रश्न पुष्कळदा विचारला जातो तो यांपैकी एकालाहि विचारावासा वाटला नाही. एकाने जीवनचित्र या दृष्टीने काव्याचा विचार केला; दुसऱ्याने काव्यातील हृदयस्पर्शित्वाला महत्त्व दिले. पण जीवनचित्राचे काय किंवा हृदयस्पर्शित्वाचे काय, अंतिम स्वरुप लेखकाच्या लेखनकाळच्या भूमिकेवरुन ठरत असते या गोष्टीला दोघांनीहि फारसे महत्त्व दिले नाही. काव्य लेखनाच्या वेळी कवि आत्मकेंद्रितहि असू शकेल किंवा वस्तूकेंद्रितहि असू शकेल. तो आत्मकेंद्रित असल्यास त्याचे वस्तूचित्र एक प्रकारचे होईल, नव्हे, त्याला वर्ण्यवस्तूचे स्वरुपच वेगळे दिसेल. उलट तोच कवि अन्य प्रसंगी स्वतःच्या सुखदुःखांच्या, रागलोभांच्या भगभगीतून मुक्त असेल व केवळ वर्ण्य विषयात रंगलेला असेल, अशा वेळी त्याने काढलेले वस्तूचित्र वेगळेच उमटेल. लेखकाचे हे दोन भिन्न दृष्टिकोन लक्षात घेऊन वाङःमयाचा विचार करता येतो. इतकेच नव्हे, तर तसा विचार करणे उपयुक्त व अपरिहार्य आहे असे आधुनिक पाश्चात्य टीकेला कळून आले. वाङमयकृतीला येणारा आकार ज्याप्रमाणे त्याच्या आशयाप्रमाणे ठरतो, त्याप्रमाणेच आशय हाहि दृष्टीकोनामुळे किंवा भूमिकेमुळे ठरतो. वाङमयाचा विचार आकाराप्रमाणे किंवा आशयाप्रमाणे जसा संभवतो, तसाच लेखकाच्या लेखनकालीन भूमिके-प्रमाणेहि संभवतो. या भूमिका सामान्यतः आत्मनिष्ठ, वस्तुनिष्ठ आणि गूढवादी अशा तीन प्रकारच्या संभवतात. ह्यांनाच 'आधुनिक साहित्याचे त्रिनेत्र' असेहि म्हणता येईल.

पण लेखकाची भूमिका याचा अर्थ त्या क्षणापुरती लेखकाने स्वीकारलेली भूमिका असाच केवळ नव्हे. आशय ज्याप्रमाणे भूमिकेवर अवलंबून असतो, त्याप्रमाणे भूमिकाहि कधीकधी लेखकाच्या व्यक्तिमत्वावर अवलवून असते. हे महत्वाचे सत्य अर्वाचीन पाश्चात्य साहित्याने जेवढे लक्षात घेतले तेवढे प्राचीन पाश्चात्य वा पौरस्त्य साहित्यशास्त्राने लक्षात घेतलेले नव्हते. भावनावादी आणि वास्तव-वादी अशा दोन भिन्न आणि मूभूलत वाङमयीन भूमिका आहेत, हा विचार अर्वाचीन पाश्चात्य टीका-वाङमयात वाढीला लागला. कलेतील रोमँटिक भूमिकेचा अुल्लेख युरोपमध्ये प्रथम चित्रकलेच्या क्षेत्रात झाल्याचे आढळते. * त्याच्याविरुद्ध

---

* Pearsall Smith........

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भूमिका ती वास्तववादी किंवा रिॲलिस्टिक भूमिका होय. ह्या दोहोला मराठी प्रतिशब्द अनुक्रमे सौंदर्यवादी व वास्तववादी हे योजिले जातात. रोमँटिक या शब्दाचे मराठी रुपांतर एकाच शब्दात करणे अशक्य आहे. मूळ इंग्रजी संज्ञेमध्ये ज्या अनेक लक्षणांचा अंतर्भाव होतो त्यांना धरुन वेगवेगळे शब्द वापरणे शक्य आहे. सौंदर्यवाद, स्वातंत्र्यवाद, नाविन्यवाद, अद्‌भूततावाद, भावनावाद ह्यांपैकी प्रत्येक शब्दात * रोमँटिसिझम्‌चे एकेक लक्षण अंतर्भूत झालेले आहे. ** "सौंदर्यात अद्‌भुततेची भर" असे रोमँटिसिझम्‌चे एक लक्षण केलेले आहे. तथापि अद्‌भुतता आणि सौंदर्य या दोहोंचाच अंतर्भाव रोमँटिक भूमिकेत होतो असे नाही. ह्याचे मुख्य कारण म्हणजे रोमँटिसिझम् ही एखादी शैलीहि नव्हे की संप्रदायहि नव्हे. रोमँटिसिझम् ही जीविताकडे पहाण्याची एक मूलभूत दृष्टि आहे; किंवा "अनुभव घेण्याचा एक मार्ग"*** आहे. वास्तववादी वृत्तीचा मनुष्य जीविताकडे अथवा अनुभवाकडे ज्या वृत्तीने पाहातो त्यापेक्षा सौंदर्यवादी मनुष्य वेगळ्याच वृत्तीने पहातो, असा ह्या मूलभूत भेदाचा अर्थ आहे. आणि म्हणून रोमँटिक आणि रिॲलिस्टिक हा भेद जरी अगदी अर्वाचीन काळात करण्यात येऊ लागला, तरी तो भेद मानवी मनाइतका जुना आहे असे म्हणावे लागते.

रोमँटिक वृत्तीच्या व्यक्तीत सौंदर्याने **** पुलकित होण्याची शक्ति इतरांहून अधिक आढळते असे म्हणता येईल. तसेच अद्‌भुताबद्दल प्रेम हेहि रोमँटिक वृत्तीच्या व्यक्तींचे एक वैशिष्टय म्हणून सांगता येईल. पण ही लक्षणे इतकी व्यक्तिगत किंवा Subjective आहेत की वर केलेली दोन लक्षणे थोडीफार ढोबळच समजावी लागतील. वस्तुस्थिति अशी आहे की, सामान्य रसिकाचे सौंदर्यप्रेम आणि रोमँटिक व्यक्तीचे सौंदर्यप्रेम यांच्या उत्कटतेतच केवळ भेद आहे असे नव्हे, तर प्रकारातहि भेद आहे. "रोमँटिक मनुष्य सुंदर दृश्याने पुलकित होतो" म्हणण्यापेक्षा सौंदर्यात तो अद्‌भुतता पाहू लागतो असे म्हणण्याने त्याच्या वृत्तीचे वर्णन अधिक यथार्थ होईल. ह्या दृष्टीने रोमँटिसिझम्‌ला ***** 'आश्चर्य भावनेचा पुनर्जन्म' असे म्हणणाऱ्या पाश्चात्य टीकाकारांच्या मतात बराच अर्थ आहे असे म्हणावे लागते.

---

* 'स्वच्छंदवाद' हा कांही टांकाकारांकडून नव्याने सुरू करण्यात आलेला शब्द अर्थदृष्टया व व्याकरण दृष्टया सदोष आहे.

** Walter Pater.

*** " A way of experiencing things........" —Abercrombie.

**** " A capacity to be thrilled in the presence of beauty."

***** " Renaissance of wonder."

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सौंदर्यवादी मनुष्याच्या सौंदर्यप्रेमात दोन अर्थांनी अद्‌भुतप्रेम अंतर्भूत असते. एकतर परिचित सौंदर्यप्रकारापेक्षा किंवा कलाप्रकारापेक्षा अपरिचित सौंदर्य, प्रकाराला त्याचे मन अधिक सहज प्रतिसाद देते. दुसरे म्हणजे जेव्हां जेव्हां सौंदर्य त्याच्या मनावर प्रबल संस्कार करते, तेव्हा तेव्हा त्याला ते अद्भुत वाटते इतकेच नव्हे, तर अचपळहि (elusive) वाटते. 'सौंदर्य' मूळात कसे असते?– अद्‌भुत असते की प्रमाणबद्ध आणि समधात असते?–हा प्रश्न येथे अप्रस्तुत आहे. तरी जे प्रतिक्षणी नवे नवे वाटते तेच सौंदर्य होय, ही संस्कृतमधील कल्पना येथे विचारात घेण्यासारखी आहे. सौंदर्याकडे पहाण्याची जशी एक शांत आणि स्थिर दृष्टि संभवते, तशीच उत्कट, पुलकित आणि विस्मित दृष्टीहि संभवते. एखादा धंदेवाईक चित्रकार किंवा शिल्पकार दुष्यंताच्या आज्ञेवरुन शकुंतलेची प्रतिकृति तयार करण्याकरिता कण्वाश्रमात गेला असता, तर त्याला शकुंतलेचे रूप जसे दिसले असते, त्यापेक्षा दुष्यंताला ते वेगळे दिसले असेल. ह्या दृष्टीनेच रोमँटिसिझम् अथवा 'सौंदर्यवाद' आणि रिअॅलिझम् अथवा 'वास्तववाद' ह्या दोहोतील भेद, म्हणजे आत्मनिष्ठ भूमिका आणि वस्तुनिष्ठ भूमिका ह्या दोहोतील भेद आहे असे अनेकदा म्हटले जाते ते योग्य आहे. तरीहि आत्मनिष्ठता आणि सौंदर्यवाद यांचे संपूर्ण समीकरण बसविण्यात थोडा दोष रहातोच. सौंदर्यवादी भूमिका ही आत्मनिष्ठ भूमिका असली, तरी 'कोणत्या जातीच्या व्यक्तीची आत्मनिष्ठ भूमिका ?' हा प्रश्न उरतोच. जेव्हां भर्तृहरि 'मुखं श्लेष्मागारम्' किंवा 'स्तनी मांसग्रंथी' असे स्त्री शरीराचे वर्णन करतो, तेव्हां तो ते वस्तुनिष्ठ भूमिकेवरुन करीत नसून आत्मनिष्ठ भूमिकेवरुनच करतो. जेव्हा एखादा कवि मुखाचे वर्णन चंद्रसदृश किंवा कमलसदृश असे करतो तेव्हां तोहि आत्मनिष्ठ भूमिकेवरुनच करतो; व जेव्हां एखादा विरक्त भर्तृहरि किंवा 'सिनिकल्' नवकवी मुखाचे वर्णन 'लाळेचे घर' असे करतो, तेव्हां तोहि आत्मनिष्ठ भूमिके-वरुनच करतो. पहिल्या भूमिकेत अनुरक्ति आणि मोह आहे; तर दुसऱ्या-भूमिकेत विरक्ति आणि चीड आहे. म्हणूनच वाङमयातील सौंदर्यवादी भूमिका म्हणजे केवळ आत्मनिष्ठ भूमिका नसून विशिष्ट जातीच्या मनाची आत्मनिष्ठ भूमिका होय असे म्हणावे लागते. मनाची जात कोणती ? हे मन जगाताकडे व जीविताकडे कोणत्या दृष्टीने पहाते ? म्हणजेच सौंदर्यवादी व्यक्तींची अनुभव-ग्रहणाची तऱ्हा तरी कोणती ? हा प्रश्न सौंदर्यवाद, वास्तववाद व गूढवाद ह्यांच्या विवेचनात महत्वाचा ठरतो.

सौंदर्यवादी व्यक्तीची सौंदर्याकडे पहातानाची वृत्ति एकप्रकारे क्षुब्ध आणि अस्थिर असते, असे म्हणता येईल व या अर्थानेच वास्तववादी लोक त्यांच्या वृत्तीला 'रोगट किंवा सदोष वृत्ति' असे म्हणताना आढळतात. अर्थात यात असे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गृहीत धरलेले असते की, अक्षुब्धता हेच मनाचे आरोग्य किंवा मनाची सहजता होय; तर 'क्षुब्धता व अस्थिरता म्हणजे मनाची रुग्णता होय'. ही गृहीत कल्पना सर्वसामान्य भारतीय दृष्टीला योग्य वाटण्यासारखी असली, तरी तिची अधिक छाननी व्हायला हवी. गटेसारख्या प्रख्यात तत्त्वचिंतकाने या कल्पनेला उद्‌गार दिल्यामुळे सौंदर्यवादासंबंधीचे व सौंदर्यवादी व्यक्तीसंबंधीचे हे शेवटचे मत होय अशी मराठीतील कित्येक लेखक कल्पना करून घेताना आढळतात. क्षुब्धता म्हणजे खरोखरच रुग्णता आहे की काय ? या प्रश्नाचा येथे निर्णय लावणे जरुर आहे. कोणत्या पातळीवरील क्षुब्धता आणि कोणत्या पातळीवरील स्थिरता हा येथे मुख्य प्रश्न आहे. पुष्कळ उदाहरणात क्षुब्धता ही समधाततेपेक्षा वरच्या पातळीवरची असते, असे आढळून येईल. निसर्गाचे किंवा कलाकृतीचे सौंदर्य पाहून जे आश्चर्याने तोंडात बोट घालतात, त्यांच्यापेक्षा जे थंड रहातात ते अधिक वरच्या भूमिकेवर आहेत असे म्हणणे योग्य होणार नाही. स्वामी विवेकानंद हिमालयातून प्रवास करीत असता, दुसरा एक साधू समोरुन येत होता. स्वामींना पाहून त्याने आश्चर्याने "शिव" असा उद्‌गार काढला. दुसऱ्या एखाद्या आधुनिक इंग्रजीशिक्षित प्रवाश्याने कदाचित्, "The fellow has striking eyes!" एवढाच उद्‌गार काढला असता. ह्या दोहोंपैकी कमी क्षुब्ध झालेला मनुष्य अधिक श्रेष्ठ भूमिकेवर आहे असे म्हणणे बरोबर होणार नाही. सौंदर्याने वा भव्यतेने स्तिमित होणे हा रोगटपणा नसून ही एक नैसर्गिक देणगी आहे. व ती सौंदर्यवादी व्यक्तींना असाधारण प्रमाणात लाभलेली असते असेच म्हणावे लागेल.

या शक्तीचा परिणाम कलानिर्मितीवर कोणता होतो, हाहि प्रश्न येथे उद्भवतो ; व तो नेहमीच कलानिर्मितीला अनुकूल असतो असे नव्हे, हेहि कबूल करावे लागते. जो मनुष्य सौंदर्यदर्शनाने बेभान होऊ शकतो तो सौंदर्याचे यथार्थ चित्रण कसे करणार ? व याच दृष्टीने सौंदर्यवादी दृष्टीला व सौंदर्यवादी कलेला सदोष ठरविण्याचा मोह विशिष्ट संप्रदायाच्या टीकाकारांना होत असावा. गटेसारख्या सौंदर्यवाद्यांच्या मुकुटमणीला तो मोह व्हावा हा मात्र टीकेच्या क्षेत्रातील एक दुर्विलास होय,– Irony होय, यात शंका नाही. पण ह्या अर्थाने सौंदर्यवादी दृष्टीत व कलेत न्यून काढणारांच्या मताचीहि अधिक छाननी करणे शक्य आहे. प्रक्षुब्ध अथवा बेभान झालेला कलावंत सौंदर्याचे यथार्थ चित्र काढू शकणार नाही हे खरे ; पण तो कदाचित् सौंदर्याचे चित्र काढण्याच्या भरीसहि पडणार नाही. तो आपल्या बेभान मनाचेच चित्र काढील. पण पुष्कळदा घडते मात्र असे की रोमँटिक् कवि चित्र काढीत असतो आपल्या अवस्थेचे तर उलट सौंदर्यवादी नसलेला टीकाकार त्या चित्रात अपेक्षा करतो वस्तुचित्राची ! याचे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रसिद्ध उदाहरण म्हणजे केशवसुत ह्यांच्या 'पुष्पाप्रत' ह्या कवितेचे. ह्या कवितेत कवि ज्या पुष्पाचा उल्लेख करीत आहे ते कोणते, हे कळत नाही, अशी टीका करणारे वास्तववादी टीकाकार आढळतात. पण येथे कवीचा विषय पुष्प नसून स्वत: आहे हे लक्षात घेतल्यास वरील प्रश्न अप्रस्तुत ठरतो.

याचाच अर्थ सौंदर्यवादी व्यक्तीचा अनुभव जसा वेगळा, तसाच त्याच्या चित्रणाचा विषयहि वास्तववादी कवींच्या चित्रणाहून वेगळा. वास्तववादी कवि वस्तूचे यथार्थ चित्र काढण्यात गर्क असतो, तर सौंदर्यवादी कवि ती पाहून झालेल्या स्वत:च्या अवस्थेचे चित्र काढण्यात गर्क असतो. ह्याच अर्थाने असेहि म्हणता येईल की, सौंदर्यवादी कवि अंत:स्थ अनुभवाशी अधिक संबद्ध असतो ; तर वास्तववादी कवि बाह्य सृष्टीशी अधिक संबंद्ध असतो. भूमिकांचे व कलानिर्मितीचे हे दोन अपरिहार्य प्रकार आहेत हे मान्य करणाऱ्या मनुष्यालाच कला व कलावंत यांच्या संबंधीची अधिक यथार्थ दृष्टि प्राप्त झाली असे म्हणता येईल.

आपल्या अवस्थेशीच कांही कलावंत अधिक प्रामाणिक असतात व अशा कलावंतांना आत्मनिष्ठ कलावंत म्हणतात, या दोन्ही गोष्टी मान्य केल्यावरहि, कलावंताच्या या जातीसंबंधी कांही प्रश्न उरतातच. आत्मनिष्ठ सौंदर्यवादी कवि वस्तुनिष्ठ वास्तववादी कवीपेक्षा नेमके कोणत्या बाबतीत वेगळे असतात, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. हाच प्रश्न दुसऱ्या भाषेत विचारावयाचा म्हटल्यास आत्मनिष्ठ कवींचा अनुभव व वस्तुनिष्ठ कवींचा अनुभव ह्या दोहोत मुळातच कांही फरक असतो काय ? व असल्यास तो कोणता ? हा प्रश्न जितका कुतूहलजनक आहे, तितकाच महत्वाचाहि आहे. या प्रश्नाचा विचार पुरता न केल्यामुळे पुष्कळदा आत्मनिष्ठ कवीच्या काव्यावर वस्तुनिष्ठ भूमिकेवरुन आक्षेप घेतले जातात. "रोमँटिसिझम् हा मनाचा रोग आहे आणि क्लॅसिसिझम् (कलेतील अभिजातता) म्हणजे कलेचे आरोग्य आहे". ह्यासारखे सिद्धांत म्हणजे अशा चुकीच्या आक्षेपांचीच परिणति होत.

अधिक विचार केल्यास असे दिसून येईल की, रोमँटिसिझम् आणि रिॲलिझम् * दोन स्वतंत्र पण विरोधी अशा जीवितदृष्टि आहेत. जेव्हां दोन वस्तू किंवा विचारप्रणाली एकमेकांच्या अगदी विरुद्ध पण एकमेकांना पूरक असतात, तेव्हां त्या दोहोंना मिळून आपल्याकडील तत्त्वज्ञानात द्वंद्व असे म्हणतात. ज्यातील एकाशिवाय दुसऱ्याचा विचार पूर्ण होत नाही त्या दोन वस्तू म्हणजे

---

* माझ्या विवेचनात मी रोमँटिसिझम्‌ची प्रतिद्वंदी विचारसरणी म्हणून 'क्लॅसिसिझम्' घेतलेले नसून रिॲलिझम् घेतले आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'द्वंद्व'. स्त्री-पुरुष, जन्म-मृत्यू, आत्मनिष्ठा-वस्तुनिष्ठा ही अशा प्रकारचीच द्वंद्व होत. सौंदर्यवादी जीवनदृष्टि आणि वास्तववादी जीवनदृष्टि ह्या दोन्ही अगदीं परस्पर विरुद्ध पण परस्परपूरक अशा दृष्टि आहेत. त्यांपैकी एक खरी आणि दुसरी खोटी, एक रुग्ण आणि दुसरी निरामय, असे म्हणणे म्हणजे जिवंत, सत्य आणि सुंदर अशा अनुभवांचा एक भाग-एक पंख-तोडण्यासारखेच आहे. टीकेच्या क्षेत्रात असा 'एकपक्षी' विचार करण्याचा मोह अनेकदा होतो. अशा एकपक्षी विचारात सत्य अजिबात नसते असे नाही. कारण असा पक्षपाती विचारवंतहि कोणत्यातरी एका बाजूचे महत्व प्रामाणिकपणाने आणि आवेशाने पटविण्याचेच कार्य करीत असतो. तथापि त्यांच्या विवेचनातील सत्य अखेर एकपक्षी अथवा एकदेशीयच असते हे विसरुन चालणार नाही. द्वंद्वात्मक अनुभवासंबंधीचे अखेरचे सत्य द्वंद्वातीत किंवा द्वंद्वसमावेशक दृष्टिकोनात असते. पाश्चात्त्य तत्त्ववेत्ता हेगेल याची परिभाषा वापरुन हेच सांगायचे झाल्यास रोमँटिसिझम् हा एक पक्ष (Thesis) व रिअॅलिझम् हा दुसरा पक्ष (Antithesis) म्हटल्यास, संपूर्ण सत्य किंवा संपूर्ण कलादृष्टि या दोहोंच्या पलिकडच्या दृष्टिकोनात असणार-हेगेलच्या भाषेत त्या उच्चतर दृष्टिकोनाला द्वंद्वसमावेशक दृष्टि अथवा Synthesis म्हणता येईल. ही Synthesis म्हणजे सौंदर्यवादी दृष्टि आणि वास्तववादी दृष्टि ह्यांची भेसळ मात्र नव्हे ! म्हणून सौंदर्यवादी कलेचा आस्वाद घेताना अनुभवाच्या दोन अपरिहार्य जातींपैकी ही एक जात आहे याची जाणीव ठेवणे जरूर आहे.

सौंदर्यवाद्याचा अनुभव वास्तववाद्याच्या अनुभवाहून कोणत्या बाबतीत वेगळा असतो, हा प्रश्न आता विचारात घेतला पाहिजे व तो विचार करताना केवळ सौंदर्यवादी दृष्टि स्वीकारूनहि चालणार नाही, की वास्तववादी दृष्टि स्वीकारूनहि चालणार नाही. तर त्या दोन्हीहि दृष्टींचा समावेश करणारी उच्चतर दृष्टि धारण केली पाहिजे. आत्मनिष्ठ-सौंदर्यवादी कवीला सृष्टि-सौंदर्याकडे अथवा स्त्रीसौंदर्याकडे पहाताना नेमके काय वाटते ? वास्तववादी कवीहून वेगळे असे काय वाटते ? वास्तववादी कवीला त्या वस्तूचे सौंदर्य गवसले असे वाटते; ते शब्दात चित्रित करता येईल असे वाटते-स्पष्ट आणि निश्चित असे वाटते-तर सौंदर्यवादी कवीला तेच सौंदर्य अमर्याद, आश्चर्यकारक आणि गूढ वाटते. एकाला ते 'सापडले' असे वाटते; तर दुसऱ्याला ते 'सापडत नाही' म्हणून चुटपूट लागते. सौंदर्यवादी कवींच्या या वैशिष्ट्याकडेच वेगवेगळ्या पाश्चात्य कलामीमांसकांनी वेगवेगळ्या दृष्टीने पाहिले आहे. अॅबरक्रॉम्बी यांच्या मते रोमँटिक कवींना गूढतेचा अथवा संदिग्धतेचा छंदच असतो. या वैशिष्ट्याचे गमक म्हणून त्यांनी कॅरेल या दुसऱ्या दर्जाच्या इंग्रज कवीची-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" Tis distance lends enchantment to the view "

ही ओळ उद्धृत केली आहे. आपल्याकडे 'दुरून डोंगर साजरे' ही अगदी व्यवहारी म्हण म्हणून वापरली जाते. अर्थात् ही मराठी म्हण आणि कॅंबेल कवीची ओळ ह्या दोहोत सत्य एकच असले तरी ते बोलून दाखविणारांची वृत्ति वेगळी आहे. माधव ज्युलियन ह्यांनी तर एके ठिकाणी

दुरुनी दिसतेस देवता । जवळूनी दिसशील तूं कशी ?

असे स्पष्टच म्हटले आहे. यात वस्तूंच्या सत्यदर्शना-संबंधीची भीति कवीने उघडपणे व्यक्त केली आहे. सौंदर्यवादी कवींना जे टीकाकार पलायनवादी समजतात, त्यांना माधव ज्युलियन् यांची ही ओळ समर्थन म्हणून चांगली उपयोगी पडण्यासारखी आहे ! पण हेहि संपूर्ण सत्य नाही. जेव्हां कवि आपली प्रिय व्यक्तिदेखील जवळ नको असे म्हणतो, तेव्हा त्या प्रिय व्यक्तीच्या सान्निध्याहूनहि प्रिय व त्या प्रिय व्यक्तीच्या सत्य स्वरूपाहूनहि सत्य असे कांही-तरी त्याने मनाशी कवटाळलेले असते. सौंदर्यवादी कवि हे संदिग्धतेचे अस्पष्ट-तेचे, Vagueness चे भोक्ते असतात हे त्यांचे ॲबरक्रोंबीने केलेले वर्णन अपुरे व एकांगीच म्हटले पाहिजे. वस्तुस्थिति अशी आहे की, वस्तूंचे सौंदर्य पूर्णत्वाने आपल्या दृष्टीत गवसतच नाही—हाती तर लागतच नाही अशी सौंदर्यवादी कवींची फिर्याद असते. जे दिसत आहे ते त्या वस्तूचे खरे किंवा पुरे स्वरूप नव्हे असे त्यांना वाटत असते. सौंदर्यवादी कवींची निसर्गासंबंधीची भावना वर्णितांना इमर्सन्ने एक विलक्षण शब्दप्रयोग वापरला आहे. कवींना निसर्गाच्या बाबतीत एक 'विचित्र मत्सर' वाटतो—'Odd jealousy' वाटते—असे तो म्हणतो. ज्या वृक्षलताकडे, निर्झराकडे किंवा दूरस्थ पर्वतराजीकडे पाहून कवि बेचैन होतो, तिच्या संबंधी त्याची भावना "Near yet not near enough" अशी असते, असे मोठे सूक्ष्म आणि सूचक निदान इमर्सन्ने केले आहे. वृक्षांच्या जाती, फुलांची नांवे, ऋतूचा तपशील यांचे फोटोसदृश वर्णन करण्यात जे कवी कलेचे सार्थक मानतात, त्यांच्या दृष्टीपेक्षा सौंदर्यवादी कवींची दृष्टि इतकी भिन्न असते की, त्या दोन कलांची तुलना करणे व्यर्थच ठरावे !

आत्मनिष्ठ सौंदर्यवादी भूमिकेवरून लिहिलेल्या काव्याचे परीक्षण जुन्या अलंकार शास्त्राच्या निकषांनी करणे जेवढे व्यर्थ, तेवढेच आधुनिक वास्तववादी निकषांनी करणेहि व्यर्थ. कारण अशा परीक्षणात लेखकाच्या मूलभूत बैठकीचाच विचार झालेला नसतो. लेखक लिहीत असतो एका बैठकीवरून, तर टीकाकार ते वाचीत असतो दुसऱ्याच भूमिकेवरून ! अर्थात् अशा परीक्षणात टीकाकारा-लाहि या भूमिकाभेदाची पुष्कळदा जाणीव असते. पण आत्मनिष्ठ सौंदर्यवादी

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भूमिकाच मूळी कलेच्या व जीवनाच्या दृष्टीने चूक आहे, असे प्रतिपादण्यापर्यंत टीकाकाराची मजल जाते. सौंदर्यवादी टीकाकारांनी वास्तववादी भूमिका कलाशून्य म्हणणे; व वास्तववादी टीकाकारांनी सौंदर्यवादी भूमिका असत्य व रोगट म्हणणे हा प्रकार गटेच्या कालापासून चालला आहे, एवढयावरून तो मोठा श्लाघ्य ठरतो असे नाही. द्वंद्वात्मक अनुभवातील एक कोटि स्वतः टीकाकाराला जवळची असली, तरी दुसऱ्या कोटीतील सत्याची व सौंदर्याची जाणीव त्याला ज्या प्रमाणात असेल त्या प्रमाणातच त्याची टीका उदार व परिपूर्ण ठरेल.

अनुभवाची ही दुसरी कोटि अथवा category समजावून घेण्याचा प्रसंगच जुन्या मराठी वा संस्कृत वाङमयाच्या संदर्भात आला नाही. याचे कारण संस्कृत वाङमय बाह्यदर्शी अलंकारशास्त्राच्या आहारी गेले. व मराठीत जे आत्मनिष्ठ वाङमय झाले ते केवळ एकाच रसाला अथवा एकाच प्रकारच्या अनुभवाला वाहिलेले झाले. ज्याला खराखुरा सौंदर्यवादी दृष्टिकोन म्हणता येईल, तो जुन्या मराठीतील आत्मनिष्ठ काव्यातहि दिसून येत नाही. वास्तविक भक्तिमार्गी वाङमय निश्चितपणे आत्मनिष्ठ आहे; परंतु ते जीवनातील सौंदर्याकडे कौतुकाने, अभिलाषेने व आश्चर्याने पहाणारे नाही; उलट अनास्थेने व तुच्छतेने पहाणारे आहे. आराध्यदैवत नामक एकाच काल्पनिक वस्तूकडे ते वाङमय रोमँटिक आर्ततेने पहाते. अशा भक्तिमार्गी वाङमयाला आत्मनिष्ठ सौंदर्यवादी वाङमय म्हणता येईल, पण त्या जातीचे ते एक अत्यंत एकदेशीय उदाहरण ठरेल. 'वास्तववादी किंवा अभिजात वाङमयाचे निकष लावता येत नाहीत' एवढयाच करिता अभंगादि मराठी भक्तिपर वाङमयाला आत्मनिष्ठ सौंदर्यवादी वाङमय म्हणता येईल. पण खऱ्या सौंदर्यवादी कवीच्या काव्यात अनुभवांची जी विविधता अथवा विविध अनुभवागंधांची जी आर्तता दिसावी लागते, ती या एकदेशीय कवींच्या या काव्यात नाही.

सौंदर्यवादी संप्रदायात बसण्यासारखे जुन्या कवीतील दुसरे म्हणजे लावणीकार शाहीर होत. जीवनातील अनुभवासंबंधीच्या औत्सुक्यामुळे आणि प्रामाणिकपणामुळे हे कवी सौंदर्यवादी ह्या नावाला अधिक पात्र आहेत. तथापि यांचेहि काव्य पुष्कळसे एकदेशीय आहे. स्त्रीसौंदर्य आणि संभोगशृंगार यांच्या बाबतीत या कवीची संवेदनशीलता जितकी तीव्र आहे तितकी इतर बाबतीत नाही. या दृष्टीने सौंदर्यवादी काव्या सबंधी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. ते केवळ आत्मनिष्ठहि नसते की केवळ सौंदर्यनिष्ठहि नसते. आत्मनिष्ठा व सौंदर्यनिष्ठा या दोहोंमुळे त्या काव्यात कित्येक वेगळेच विशेष आलेले असतात. आत्यंतिक संवेदनशीलतेमुळे सौंदर्याच्या अप्राप्यतेवर अशा काव्यात भर दिला जातो

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तसाच स्वतःच्या दुःखीपणावर व दुर्दैवीपणावरहि भर दिला जातो. म्हणून एक प्रकारची गूढ खिन्नता व आत्मप्रीति हेहि खऱ्या सौंदर्यवादी कवींचे एक प्रमुख लक्षण ठरते. आपल्या जुन्या लावण्यात सौंदर्यवादी काव्याची कांही लक्षणे आढळली, तरी वरील प्रमुख लक्षण, म्हणजेच, "Romantic melancholy" आढळत नाही. ही गूढ खिन्नता ज्या अंतर्मुखतेतून निघते ती अंतर्मुखता खेडवळ आणि स्त्रीलंपट अशा शाहिरात अपेक्षिणे व्यर्थ होय. या ठिकाणी जुन्या शाहिरांचा उणेपणा काढण्याचा हेतु नसून सौंदर्यवादी मन ही वस्तु केवळ लंपट मनाहून वेगळी आहे, हे दाखवून देण्याचा हेतु आहे. रोमँटिक मनासंबंधी यथार्थ कल्पना मराठीतील पुष्कळ लेखकांना नसल्याने व उलट सौंदर्यवादी जीवित दृष्टीसंबंधी पाश्चात्य टीकावाङ्मयात असलेले वरेच गैरसमज त्यांच्या वाचण्यात असल्याने, वरील भेद अधिक विस्ताराने स्पष्ट करणे आवश्यक आहे. केवळ सौंदर्याने व्याकुळ होणे नव्हे, तर त्या व्याकुळतेमुळे स्वतःच बुडी घेणे व अधिक अंतर्मुख होणे, हेहि सौंदर्यवादी कवीचे एक खास वैशिष्टय आहे. त्यांच्या या अंतर्मुखतेचे फलित अनुभूतिदृष्टया व वाङ्मयदृष्टया कोणते, ते 'गूढवादा'चा विचार करताना अधिक स्पष्ट होईल. तथापि, शाहिरी कवीत वहिर्मुख सौंदर्यासक्ति होती, पण अंतर्मुख सौंदर्यासक्ति नव्हती, म्हणजे काय ते पाहिले पाहिजे. एकदोन उदाहरणांनी ते स्पष्ट होण्यासारखे आहे. एक मराठी शाहिर म्हणतो,

तुझ्या नादानं झाली माझी दैना ।
तूं सांग कुणाचो ग मैना ॥

या काव्यपंक्तीत आसक्ति आहे व सौंदर्यहि आहे. लावणीच्या द्रुत लयीतील गायनात ते सौंदर्य अधिकच वाढते, हेहि खरे. या आसक्तीतील खेडवळ (unsophisticated) मोकळेपणा नागर वाचकासहि मोहून टाकतो, हे खरे पण सुसंस्कृत पाश्चात्य वळणाच्या रोमँटिक कवीत जी अंतर्मुखता आढळते, ती या उघड आसक्तीत नाही. पण ही अंतर्मुखता केवळ पाश्चात्य रोमँटिक कवीतच आढळते असे नव्हे. ज्या उर्दू कवींनी इंग्रजी काव्य वाचलेहि नव्हते, अशा कवींच्या काव्यात शेले, बायरन् ह्यांच्या काव्याहूनहि अधिक खोल व रम्य अंतर्मुखता आढळते. वरील मराठी शाहिराप्रमाणेच एका प्रसिद्ध उर्दू कवीलाहि "झाली माझी दैना" हीच भावना व्यक्त करावयाची आहे. अशा वेळी तो काय म्हणतो हे पाहण्यासारखे आहे.

जिनको अपनी ख़बर नही अबतक ।
वो मेरे दिलकी राज़ क्या जाने ?
जो गुजरते हैं दागपर सदमें ।
आप बंदानवाज क्या जाने ।*

---

* दाग.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(ज्यांना आपल्या हृदयाचीच खबर नाही ते माझ्या हृदयाचे रहस्य काय जाणणार ? या दागवर (स्वतः कवीवर) ज्या आपत्ति कोसळत आहेत त्याचा खावन्दांना (प्रियेला) काय दाद असणार ?)

या उद्गारात केवळ 'दैनेचे' वर्णन नाही, तर ज्याची दैना झाली आहे त्याच्या खोल आणि संपन्न हृदयाचेच विशेष वर्णन आहे. प्रिय व्यक्ति कवीला अप्राप्य आहे, एवढेच नव्हे, तर तिच्यात कवीच्या बहुमोल हृदयाचे रहस्य जाणण्याची पात्रता नाही, हे कवीचे मुख्य दुःख आहे. हे दुःख आणि खेड्यातील जत्रेच्या वेळी बाजाराकरिता आलेल्या कोणातरी अनोळखी 'मैने'ला पाहून खेडवळ शाहिराला झालेले दुःख यात महदंतर आहे.

या दृष्टीने रोमँटिक काव्य हे विकसित, संवेदनशील, संपन्न अशा आधुनिक व्यक्तिवादाचे काव्य आहे. त्यात केवळ प्राचीन आदर्शाप्रमाणे रचलेल्या विद्वत्ता-प्रचुर विदग्ध काव्याला स्थान नाही. तसेच त्यात केवळ बहिर्मुख सौंदर्यवर्णनानेहि भागण्यासारखे नाही. त्याचा विषय बाह्यसृष्टि अथवा समाज यांच्यापेक्षा कवीचे व्यक्तिमत्व हा असतो. व ह्या व्यक्तिमत्वाचीच गळचेपी जुन्या काव्यात झालेली होती. ब्रिटिश् अंमलाच्या आगमनाबरोबर व्यक्तीला आपल्या हक्काची जशी जाणीव झाली, तशीच कवींना अलंकारशास्त्राच्या अडगळीत गुदमरलेल्या आपल्या व्यक्तिमत्वाचीहि जाणीव झाली. पूर्वीच्या आदर्शानुसार केलेल्या स्त्री वर्णनाने वा निसर्गवर्णनाने त्यांचे समाधान होईना. त्या काव्यात त्यांना स्वतःचा ओळख दिसेना व वस्तूंची ओळखहि उसनी अथवा Secondhand असल्याचे आढळून आले आणि म्हणूनच केशवसुतादि कवी स्वहृदयाच्या जाणीवेने जागृत होऊन उठले व स्वानुभूतीची काव्ये लिहू लागले. अशा स्वानुभूतीचा काव्य–संप्रदाय म्हणजेच आधुनिक मराठी काव्यसंप्रदाय होय. जुन्या कवींना उद्देशून तो काव्यसंप्रदायहि

जिनको अपनो खबर नही अबतक ।
वो मेरे दिलकी राज़ क्या जाने ? ।

असेच बहुधा म्हणत असेल !

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जखम

अबोल जखम
ढाळणार आसू
जीवनाचे हासू
—झाले माझ्या

शोध अंतरात
वेड्याची ही व्यथा
अर्धवट कथा
—स्मर आता

ठेव लहरा
व्यथेची कविता
तूझी वाट आता
—कुठे पाहूं ?

शोधण्याचा भार
सांगतो पुष्पाना
सुगंध घेताना
—आठव तू !

मरताना आता
वेडावते स्मृती
तूझी माझी प्रीती
सर्वकाळ—

—माणिक भोयर

माझ्या दुबळ्या भावात

आंसवांच्या ओंजळीत
गोंजारिते मूकपणा

सुख लावुनि पणास
नादविते जीववीणा

अति आतुर भावना
छेडितसे मृदु ताना

हुळहुळे शब्दगीत
भारावतो दीनपणा !

असे नि:शब्द संगीत
निनादते मानसात

माझ्या दुबळ्या भावात
शब्द गुंफले कितिक !

—सौ. कान्ता रहाटगांवकर

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अजुनी स्मरती—

अजुनी स्मरती तव नेत्रीचे अगतिक मौक्तिक पूर
आणि भासतो सृष्टीचा ग उदास रडवा नूर
झुळझुळणारे निर्झर गाती गीत आज गंभीर
निःशब्द झाले वारे, तरु ही तटस्थ मौनी पीर
फुलवित हृदयी वसंत, होतो प्रेणयी आपण चूर
तोच गर्जले जर्नांनदेचे निर्दय नीच असूर
रुसले मजवरी जीवन आता, झाली प्रीत अनाथ
जाता तू या मंद दिव्याची विझू पाहते वात

—मुकुंद बुटी

होम

परिस्थितीच्या आगीत
झाला सर्वस्वाचा होम
जड उजाड स्वप्नांचे
मनी काहूरले तम
माझे डंखले काळीज
तीव्र सोसल्या यातना
पापणीत बिंदू उभा
वाळवंटल्या भावना
नाद पेटल्या प्राणांचा
शांत, थंड स्मशानात
साथ भयाण पक्षांची
आज माझ्या जीवनात

—कुसुमानंद

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महाकाव्य न लिहिलेल्या—

महाकवीची कविता

ले. प्रा. श्री. मा. कुलकर्णी

(दि. २८ मे हा स्वातंत्र्यवीर सावरकरांचा जन्म दिन. त्या निमित्ताने हा लेख आम्ही प्रकाशित करीत आहोत.)

—संपादक

आधुनिक भारताच्या इतिहासात स्वा. सावरकरांचे स्थान अद्वितीय आहे. तसेच आधुनिक मराठी कवितेच्या इतिहासात त्यांच्या कवितेचं स्थानहि अद्वितीय आहे. या भरतभूमीत साधुसंतांची, सत्पुरुषांची, महात्म्यांची, वीर पुरुषांची, थोर देशभक्तांची कधी वाण पडली नाही. इतिहासाच्या पानापानावर अशा विभूतींच्या चरित्राची नोंद आढळेल. त्यात श्रेष्ठ कनिष्ठ कोण व कसे ठरविणार? शिवाय त्याची गरजहि नाही. पण तरीहि या सर्व अलौकिक विभूतींच्या व्यक्तिमत्वाहून निराळे व्यक्तिमत्त्व, त्यांच्या चरित्राहून भिन्न चरित्र व त्यांच्या परिस्थितीहून अगदी वेगळी अशी परिस्थिति सावरकरांची आहे. म्हणूनच ते अद्वितीय आहेत असे मी म्हटले. तोच प्रकार त्यांच्या कवितेचा. थोर देशभक्तांची तशीच थोर कवींची वाणहि महाराष्ट्राला कधी पडली नाही. पण तरीहि सावरकरांच्या देशभक्ति प्रमाणेच त्यांचे कवित्वहि सर्वाहून वेगळे, अद्वितीय असेच आहे.

वयाच्या ५ व्या ६ व्या वर्षीच सावरकरांना मोरोपंतांच्या अनेक आर्यांचे पाठांतर घडले. पुढे १० व्या वर्षापर्यंतच हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप इ. काव्यग्रंथांचे श्रवण व वाचन त्यांनी केले. वामनाचे श्लोक त्यांच्या परिचयाचे झाले, सप्तशतीचा पाठ त्यांच्या कानावरून गेला. संस्कृत श्लोकांचेहि श्रवण व पाठांतर त्यांच्याकडून याच वयात घडले. निबंध मालेचे अंक, केसरीच्या फाइली, जुन्या बखरी या सर्वांचा फडशा त्यांनी याच वयात पाडला. या सर्व श्रवण, पाठांतर वाचनादिकांमुळे व वडिलांच्या सुयोग्य शिकवणीमुळे सावरकरांच्या ठिकाणी या बालवयातच काव्यशक्ति व वीरवृत्ति या दोहोंचाहि परिपोष झाला.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'सवाई माधवरावांचा रंग' ही कविता सावरकरांनी वयाच्या ११व्या वर्षी लिहिली. पुढे ते नाशकास गेले. तेथेहि त्यांचे वाचन अखंड चालू होते. होमरच्या इलियडचे भाषांतर वाचून पेशव्यांवर महाकाव्य लिहिण्याचा विचार त्यांच्या मनात याच वेळी आला होता. पोवाड्यांच्या वाचनाने त्यांचं अंतःकरण याच काळात थरारून उठत असे. १८९७ हे साल मोठेच धामधुमीचे. दुष्काळ, प्लेग, रँडचा खून, चाफेकर बंधूंना फाशी, द्रविडाचा खून व रानड्याला फाशी अशी एकच धामधूम सुरु होती. या घटनांचा सावरकरांच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. मध्यरात्री अश्रु ढाळीत चाफेकर बंधूवर ते पोवाडा लिहायला लागले.

१८९९ मध्ये सावरकरांनी मित्रमेळा नावांची संस्था स्थापन केली. थोर राष्ट्रपुरुषांचे उत्सव साजरे करावेत व राष्ट्रात धर्मप्रेम व राष्ट्रभक्ति निर्माण करावी हा या संस्थेचा कार्यक्रम होता. या मेळ्यासाठी पदे व पोवाडे सावरकर व कवि गोविंद करीत असत. कलगी तुरेवाल्यांना लावण्या करून द्याव्यात, भजनी मंडळासाठी अभंग करून द्यावेत असाहि क्रम या काळात सावरकरांचा होता.

त्यांचे इंग्रजी वाचनहि चालूच होते. १९०० च्या सुमारास इंग्रजी सहाव्या इयत्तेत असताना स्कॉटच्या 'लेडी ऑफ दि लेक' या काव्याचे थोडेसे भाषांतरहि सावरकरांनी केलेले आहे. मोरोपंतांच्या गंगावकिली प्रमाणे गोदावकिली त्यांनी याच काळात केलेली आढळते. पुढे कॉलेजात असता मराठी, संस्कृत वाङ्मयाच्या वाचनाबरोबरच मिल्टन, शेक्सपियर, स्कॉट, शेले, कीटस्, वर्डस्वर्थ इ. इंग्रजी कवींच्या काव्याचाहि त्यांनी परिचय करून घेतला.

याच कालखंडात त्यांनी विधवांच्या दुःस्थितीवर एक काव्य लिहिले. पारतंत्र्याची जाणीव व्यक्त करणारी व त्याचा उपहास करणारी 'वृषोक्ति' ही कविता, शिवाजी महाराजांच्या गौरवपर शिवगीत व शिवाजी महाराजांची आरती इ. कविता याच काळात म्हणजे १९०० ते १९०५ या काळात त्यांनी लिहिल्या. या काळातील विशेष उल्लेखनीय कविता म्हणजे सावरकरांनी लिहिलेले दोन पोवाडे. एक तानाजी मालुसरे याचा व दुसरा श्री बाजी प्रभूचा. पहिला पोवाडा महाराष्ट्रात एकेकाळी सर्वतोमुखी झाला होता. दुसरा इतका लोकमुखी झाला नव्हता तरी काव्यगुणांनी तो पहिल्यापेक्षाहि श्रेष्ठ आहे. बाजीप्रभूंच्या पावनखिंडीतील शौर्याला व स्वामीभक्तीला तानाजीच्या सिंहगड प्रसंगीच्या शौर्याची व स्वामीभक्तीचीच उपमा देता येण्या सारखी आहे. असा हा रोमांचकारी प्रसंग सावरकरांच्या वीरवाणीतून जेव्हां प्रगट होतो, तेव्हां वाचकांची अंतःकरणे भारावून जातात, त्यांच्या वृत्ति स्फुरण पावू लागतात.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'चला घालु स्वातंत्र्य संगरी रिपूवरी घाला' हे पालुपद आवेशपूर्ण आहे. आरंभी यवनांच्या चाकरीत असलेला बाजी शिवदूताच्या प्रभावी उपदेशाने स्वातंत्र्योन्मुख झाला व म्हणाला—

मद्देशचि माझा राजा
तो प्राण देव तो माझा
मी शरण शिवा सांगा जा
राख उडाली प्रदीप्त बाजी वैश्वानर ठेला
चला घालु स्वातंत्र्यसंगरी रिपूवरी घाला

त्यातून बाजीच्या वीरश्रीचे हे वर्णन तर स्फुरणदायी आहे—

गडांत जाइल राष्ट्रदेविचा जिवलग शिवराणा
तोंवरि लढवू खिंड शूर हो अपुला बाणा
ह्या बाण्याच्या आधि संगरी जरि घडता मरणे
पुनर्जन्म तत्क्षणी घेउनी पुन पुन्हा लढणे
तोफे आधी मरे न बाजी सांगा मृत्यूला
जखम कुठेरे फक्त असे मी तृपाक्रान्त योडा
रिपुरक्ताला पितो घटघटा सोडा मज सोडा

बाजीच्या समाधानी मृत्यूने या प्रसंगाचा झालेला शेवट जितका करूण तितकाच उदात्त आहे. ही करुणोदात्तता पोवाड्याच्या शेवटी उत्कटतेने प्रगट झाली आहे. गतिमानता, सरलता, परिणामकारिता इ. सर्व गुणांनी हा पोवाडा संपन्न आहे.

१८९४ ते १९०६ हा एका तपाचा काळ म्हणजे सावरकरांच्या तपश्चर्येचाच काळ होता. या काळात त्यांच्या भावना पोखत होत्या, बुद्धि विकासत होती, मन प्रगल्भ होत होते, ध्येय निश्चित होत होते, आत्मिक शक्तींची वाढ होत होती. काव्यलेखनाच्या दृष्टीनेहि हा काळ तपश्चर्येचाच होता. अनुकरण, अनुवादादिकांनी रचनेचा अभ्यास चालू होता तर श्रवण-मनन-चिंतन निदिध्यासादिकांनी कवित्वादि सर्वच शक्तींची वाढ होत होती. या पहिल्या कालखंडातील कविता या गोष्टीची साक्ष देईल. 'श्रीमंत सवाई माधवरावांचा रंग' ही या कालखंडांतील पहिली कविता व 'श्री बाजीप्रभूचा पोवाडा' ही शेवटची कविता. या दोन कवितांची तुलना केल्यास सावरकरांच्या कवित्वादि शक्तींच्या विकासाची चांगलीच कल्पना येते. एका तपाच्या तपश्चर्येचा फलस्वरूप असलेला बाजीप्रभूचा हा पोवाडा सर्वच दृष्टींनी संस्मरणीय आहे.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९०६ साली सावरकर इंग्लंडला गेले. जातानाचा प्रवास त्यांच्या विरहीमनाला उदासवाणा वाटला असल्यास नवल नाही. मन रमविण्या करिता रात्री ते बोटीच्या डेकवर फिरत. त्यावेळी त्यांनी 'तारकास पाहून' ही कविता रचली. आरंभीचे आकाशापर्यंत भिडलेल्या नील सागराचे हे वर्णन अत्यंत काव्यमय आहे–

नुमजे लागे कुठे नभ कुठे जलसीमा होई
नभात जल ते, जलात नभ ते संगमुनी जाई

एक तारका तुटून समुद्रजलात घुसताना दिसली ते पाहून सावरकरांचे विरही मन म्हणते :–

प्रेमाची चांदणी परंतू ज्यांची दूर वसे
किती प्रवासी तळमळती बा, तुझ्या निकट ऐसे
तुझा तुझ्या चांदणिशी पाहुनि प्रिय संगम साचा
तव मत्सर ना, परी छळी त्या वियोग दयितांचा

पण या कवितेचा शेवट तत्वचिंतनात झालेला आहे ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे.

विलायतेत असताना कायद्याच्या अभ्यासाबरोबरच एकीकडे स्वातंत्र्य प्राप्तीची चळवळ ते करीत होते व दुसरीकडे वाचन व ग्रंथलेखन चालू होते' मॅझिनीच्या चरित्राचे लेखन त्यांनी केले व इतिहासाचा सखोल अभ्यास करून १८५७ चे स्वातंत्र्य समर हा ग्रंथ इंग्रजीत लिहून काढला. या काळात देश-भक्तीने त्यांचे अंतःकरण ओसंडून वाहात होते. ते अंतःकरण काव्य रूपानेहि प्रगट होत होतं. 'हिंद सुंदरा ती !' 'प्रियकर हिंदुस्थान' या कविता लंडन येथेच रचलेल्या आहेत.

जननि ! तुझ्या सन्मान-रक्षणी अर्पु रणी हे प्राण
शत्रुकंठ भंगोनि घालु तुज दारुण रक्तस्नान

अशा प्रकारे ही ज्वलंत देशभक्ति व उत्कट स्वातंत्र्यप्रीति या कवितात प्रगट झाली आहे.

ते लंडनमध्येच असता त्यांचा लहान ४ वर्षाचा मुलगा प्रभाकर वारल्याची वार्ता त्यांना कळली. त्याच्या स्मृत्यर्थ लिहिलेल्या 'प्रभाकरास' या कवितेत त्यांचे पितृहृदय, त्याच्या आकांक्षा, त्याला झालेला शोक व शेवटी त्याला घातलेला आवर या सर्व गोष्टींचे करूणरम्य दर्शन होते.

नवप्रसव तव जननी मजला दावित असतां ही
गुरूजनमर्यादेने म्यां बहु पाहियले नाही

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या ओळीत तत्कालीन संस्कृतीचे किती मनोरम दर्शन घडते पहा. त्याला सोडून विलायतेस गेल्यावरहि,

अतनु मूर्ति तव लटकुनि कितिदा हृदयाशी निजली
हसली कितिदा दिव्याशेने कितिदा ती सजली

पण हा पिता सामान्य नव्हता. आपल्या मुलाने I.C.S. व्हावे अशी त्याची आकांक्षा नव्हती. तो म्हणतो—

धर्म–कार्य–सिद्धयर्थ घाडुनी रणी खड्गपाणि
बाल वाल–झुंजार आपुले श्री गोविंदानी
हुतात्म होता हसत पाहिले सुकीर्ति परिसुनी ती
म्यांहि कितीदा रणी पाहिली अमूर्त तव मूर्ती

मृत्यूने ही आकांक्षा विफल केली. पण सावरकरांचे मन खचले नाही. मृत्यूने आपले कांहीच हरून नेले नाही असे सांगून ते म्हणतात—

पूर्वि जसा होतास अससि तूं नंतरही सखया
अमूर्त तूं कल्पना एक मधु–मधुर अशी हृदया

पुत्राच्या अकाल मृत्यूने जेवढा त्यांचा जीव हळहळला नसेल तेवढा किंवा त्याहून अधिक मातृभूमीच्या चिरवियोगाच्या कल्पनेने त्यांचा प्राण तळमळला. 'अभिनव भारत' या संस्थेवर सरकारची वक्रदृष्टि झाल्यामुळे यापुढे आपणाला हिंदुस्थानला परतता येणार नाही व आपण धरले जाऊ असे त्यांना वाटले. समुद्रकाठी जाऊन स्वजनांच्या स्वभूमीच्या वियोगाने ते सागराला म्हणू लागले—

ने मजसी ने परत मातृभूमीला । सागरा, प्राण तळमळला ?
शुक पंजरि वा हरिण शिरावा पाशी । ही फसगत झाली तैशी
भू विरह कसा सतत साहु या पुढती । दशदिशा तमोमय होती

आपले सर्वस्व भूमातेसाठी आहे हा सावरकरांचा दृढभाव असा प्रगट झाला आहे—

गुण–सुमने मी वेचियली या भावे । की तिने सुगंधा घ्यावे
जरि उद्धरणी व्यय न तिच्या हो साचा । हा व्यर्थ भार विद्येचा
नभि नक्षत्रे वहुत एक परि प्यारा । भज भरत भूमिचा तारा
तिजवीण नको राज्य, मज प्रिय साचा । वनवास तिच्या जरि वनिचा

पण सावरकरांचे अंतःकरण नुसता दुवळा शोक करणारे नाही. ते आंग्ल-भूमि–भयभीत सागराला म्हणतात—

अवला न माझि ही माता, रे
कथिल हे अगस्तिस आता, रे
जो आचमनी एक क्षणि तुज प्याला

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सावरकरांच्या स्वदेशभक्तीला तोड नाही. ती जितकी उत्कट तितकाच तिचा आविष्कार उत्कृष्ट आहे. उदात्त व उत्कट भावनेच्या या सहजोद्‌गाराला मराठी काव्यात तोड सापडणार नाही.

याच कालावधीत लिहिलेल्या 'सांत्वन' व 'माझें मृत्युपत्र' या दोन कविता सावरकांच्या अंत:करणातील उदात्त भावनांना, जाज्वल्य विचारांना व धीर गंभीर तत्त्वज्ञानाला साकार करणाऱ्या आहेत. वडील बंधूंना जन्मठेप काळे पाण्याची शिक्षा झाली. धाकटे बंधुहि पकडले गेले व स्वत:हि पकडले जाणार याची खात्री. अशा परिस्थितीत आपल्या वहिनीचे सांत्वन करण्यासाठी पहिली कविता व आपल्याहि अटकेची दु:खद वार्ता तिला कळविण्यासाठी व आपल्या कार्याचे मर्म व महत्त्व स्पष्ट करून तिला धीर देण्यासाठी दुसरी कविता लिहिली. ही दुसरी कविता ब्रिक्स्टन जेलमधून बहुधा शेवटचा निरोप म्हणून लिहिलेली आहे.

पहिल्या कवितेतील—

अमर होय ती वंशलता । निर्वंश जीचा देवाकरिता ।
दिगंती पसरें सुगंधता । लोकहित परिमलाची ।।

या ओळी आणि दुसऱ्या कवितेतील—

त्वत्स्थंडिलावरि बळी प्रिय बाळ झाला
त्वत्स्थंडिलीं बघ अता मम देह ठेला
हे काय, बंधु असतो जरि सात आम्ही
त्वत्स्थंडिलीच असते दिधले बळी मी

या ओळी यांच्यापैकी अधिक धीर गंभीर व अधिक करूणोदात्त कोणत्या हे ठरविणे कठिण आहे. पुढील ओळीत तर सावरकरांचे निष्काम कर्मयोगी मन उत्कृष्ट रीतीने प्रगट झाले आहे—

हे आपुले कुलहि त्यांमधि ईश्वरांश
निर्वंश होउनि ठरेल अखंड–वंश
कीं ते ठरोहि अथवा न ठरो परंतु
हे मातृभू अम्ही असो परिपूर्ण हेतु
दीप्तानलात निजमातृ—विमोचनार्थ
हा स्वार्थ जाळुनि अम्ही ठरलो कृतार्थ

या कवितेतील पुढील ओळी तर सावरकरांच्या बुद्धिनिष्ठ ध्येयप्रवणतेची अमर साक्ष ठरल्या आहेत—

की घेतले व्रत न हे आम्हि अंधतेने
लब्ध–प्रकाश इतिहास–निसर्ग–माने
जें दिव्य, दाहक म्हणूनि असावयाचे
बुद्‌ध्याचि वाण धरिले करि हें सतीचें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सावरकरांचा या पुढील काव्य निर्मितीचा इतिहास अत्यंत अद्‌भुत आहे. निर्मितीचा इतिहास जितका अद्‌भुत तितकीच प्रत्यक्ष निर्मिति उदात्त आहे.

बोटीवरून निसटण्याचा प्रयत्न विफल झाल्यावर आता अमानुष छळाला तोंड द्यावे लागणार या जाणिवेने मनाला धैर्याचा पुरवठा करण्यासाठी धीरोदात्त तत्त्वज्ञानाचा त्यांनी मनाला पाठ दिला.

'आत्मबल' या कवितेत ते म्हणतात—

अनादि मी, अनंत मी, अवध्य मी मला
मारिल रिपु जगति असा कवण जन्मला

पुढे पन्नास वर्षांची जन्मठेपेची शिक्षा ऐकिल्यावर मातृभूमीच्या ऋणफेडीचा पहिला हप्ता म्हणून हा देह मी अर्पितो व 'सर्वेचि जन्मुनिया । त्वन्मोचन हवनात । हवी करू पुनः पुन्हा काया'

अशी दुरंत देशभक्ति व दुर्दम्य ध्येयनिष्ठा त्यांनी प्रगट केली. लंडनच्या पोलीस चौकीत बंद असता भयंकर थंडीने शरीरातील रक्त गोठून जाऊ नये म्हणून फेऱ्या मारता मारताच मनातील उत्साह आटू नये म्हणून त्याला उत्साहाचा पुरवठा करण्यासाठी 'मूर्ति दुजी ती' ही एक अशीच अमर कविता सावरकरांनी लिहिली. कोमल मूर्ति सोडून विकराळ मूर्ति धारण करण्या विषयी ते कवितेला आवाहन करतात. 'श्री बंदा वीर' याच्या वीर मृत्यूचे रोमांचकारी वर्णन करून सावरकर म्हणतात—

ज्या सुरात बंदाच्या हृदय–तंतुसी
लावुनि तू धारगीत गाइलेस ते
व्यक्ति–मरण सौख्याचे असह–त्याच ये
त्या सुरात कविते ! तनु तंतु वाद्य हे
माझेही बांध राग तो निराश गा

अशाहि दुःखद स्थितीत ध्येयाला सोडण्याला मात्र ते तयार नाहीत. शेवटी ते म्हणतात—

हे सहेनची
याहुनिही भयद असे छळ सहेनचि
परि झटेन, जीवनांतिही झटेनची
करण्यासी ही विमुक्त मातृभू पुन्हा

अंदमानात गेल्यावर तेथील एकलकोंडीत बंद असता व घोर छळ सहन करीत असता लेखन साहित्याच्या अभावी अणकुचीदार दगडाने भिंतीवर काव्य लिहावे, ते पाठ करून स्मृति संपुटात साठवावे, पुन्हा दुसरे लिहावे. कधी

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कधी हेहि लिहिण्याचे साधन हिरावून घेतले जाऊन पायाप्रमाणे हातातहि बेड्या पडाव्यात तेव्हां मनातच कविता कराव्यात व त्या पाठ कराव्यात अशा पद्धतीने सावरकरांची कविता जन्मली. काव्यनिर्मितीच्या या अद्‌भुत, रोमांचकारी इतिहासाला जागतिक वाङमयात तोड सांपडावयाची नाही. वेडी, कोठडी, हिंदुनृसिंह, जगन्नाथाचा रथोत्सव, सूत्रधारास, अज्ञेयाचे रूद्धद्वार, इ. स्फुट कविता व आकांक्षा, सायंघटा, चांदोबा चांदोवा भागलास का? इ. दीर्घ कविता सावरकरांच्या तत्वज्ञानाचे, त्यांच्या ध्येयनिष्ठेचे, त्यांच्या सुख दुःखात्मक विचारांच्या आंदोलनांचे उत्कृष्ट दर्शन घडवितात. त्याच बरोबर त्यांच्या दिव्य प्रतिभेचे सामर्थ्यहि त्यातून प्रतीत होते.

आपल्या पूर्व संकल्पाप्रमाणे महाकाव्य रचण्यासहि त्यांनी अंदमानातच प्रारंभ केला. त्याचेच स्फुट भाग म्हणून कमला, विरहोच्छ्‌वास, गोमंतक इ. दीर्घ काव्ये त्यांनी लिहिली. पैकी गोमंतक हे निर्यमक म्हणून ते तेथे स्मरणात ठेवणे त्यांना कठिण जाऊ लागले म्हणून पुढे रत्नागिरीस लेखन साहित्य मिळाल्यावर त्यांनी ते पूर्ण केले. परंतु कमला काव्य अंदमानाच्या कारागृहातच उपरोक्त पद्धतीने निर्माण झाले. त्यांतील मनोरम वर्णने, नाजुक शृंगार, बहारदार कल्पना इ. पाहून कवीच्या स्थितप्रज्ञते विषयी आदर व प्रतिभाशालित्वाविषयी साश्चर्य कौतुक वाटल्याविना राहत नाही. फुलबागेच्या मनोरम वर्णनातील ही एक रम्य कल्पना पहा–

फुलें? अहा फुले ना ती उद्यानी विहरावया
रात्रींत चोरूनी येता अप्सरा, धरिलें जयां
नोंद त्या दिव्य पाप्याची ठेवू जाईवरी असे
चुंबनांचेचि त्यांच्या घे देवी द्वारप हे ठसे!

भ्रमराचे हे वर्णन पहा—

दयिता दयितांमाजी सुमलोकातल्या पहा
घाली खेपा मधावारी मदनाचा दलाल हा!

फुलाफुलांचे काव्यमय वर्णन, विशेषतः जलार्धमग्न वाला अशा नलिनींचे बहारीचे वर्णन मुळातूनच वाचून पहावे. याच काव्यातील 'पहिल्या चुंबनाचे' हे नाजुक व थरथरते वर्णन पहा–

कमला बागेत असते व मुकुंद येतो—मग

'चोरट्या कटिला गुंफी कांपता कर तो झणी
लाजऱ्या लागती गाला ओठ लाजत त्यांहुनी'

अंदमानातून परत आल्यावरचा काळ हा सावरकरांच्या काव्य लेखनाचा तिसरा कालखंड होय. या कालखंडात गोमंतक हे दीर्घ काव्य लिहून झाले.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्याचा परिचय येथे करून देणे शक्य नाही. या तिसऱ्या खंडातील कविता संख्येने जशी विपुल नाही तशीच गुणांनीहि ती श्रेष्ठ नाही. कांहीसं प्रासंगिक, थोडंसं प्रचारकी असं या काव्याचं स्वरूप आहे. मात्र या कालखंडातील 'अटकेवर जरि पटका' हे दीर्घकाव्य इतिहासकथन, भावाविष्करण, तत्त्वबोध, आवेश इ. सर्वच दृष्टींनी संस्मरणीय आहे.

सावरकर हे जातिवंत कवि आहेत. याच क्षेत्रात आपण चमकावे अशी त्यांची मूळ मनीषा. रवींद्रनाथ टागोरांना नोबेल पारितोषिक मिळालेले ऐकून सावरकरांना आनंद झाला व त्यांनी अंदमानातूनच एक काव्यमय अभिनंदन पत्र टागोरांना पाठविले. त्यांत ते स्पष्टच म्हणतात की—

"कविकक्ष पूर्ण हा माझा
परि उणीव तेथे जा जा
क्रांतिच्या वाष्पयंत्राचा कक्ष तो"

अशी देवीची आज्ञा झाली म्हणून ते त्या कक्षांत गेले. 'मूर्ति दुजी ती' या कवितेतहि निराळ्या रीतीने या गोष्टीची साक्ष पटते—

'कां? कविता काय कुणी पण्य अंगना
कीं जोवरि उत्सवीय मनविमोहका
सुवर्ण रत्नमौक्तिकांत तनु अलंकृता
तोंवरीच मात्र हात हंसत धरूं ये?
ना, ना, ना! कुसुम सुगंधीय लाघवी
ता रे व रि वीणेच्या नाचति मुदें
तींच तिची होऊनिया वज्र कर्कशें
धा रे व रि खड्गाच्या नाचती पदें
कविता निजभक्ता त्यागिना कधी—

आणि खरोखरीच त्या दारुण स्थितीतहि कवितेने त्यांना साथ दिली. सावरकरांच्या सर्व शक्तिप्रमाणेच त्यांची काव्यशक्तीहि मातृभूमीला वाहिलेली होती हे विशेष होय.

हे मातृभूमि तुजला मन वाहियेले
वक्तृत्व वाग्विभवहि तुज अर्पियेले
तूंतेंचि अर्पिलि नवी कविता रसाला
लेखाप्रति विषय तूंचि अनन्य झाला

रचनेच्या दृष्टीनेहि ती आधुनिक कवितेहून अगदी वेगळी आहे. या दृष्टीनेहि सावरकरांची कविता अलौकिक आहे. तिच्यात उणीवा नाहीत असे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाही. पण आत्मपरता, ओजस्विता, तेजस्विता, प्रभावित्व, उत्कट भावमयता दिव्यता, दाहकता, मृदुता, ऋजुता, प्रेरकता इ. अनेक अलौकिक गुणांनी ती मंडित आहे. त्यातच सावरकरांच्या दिव्य जीवनाचे, विशाल अंतःकरणाचे उत्कट देशप्रेमाचे, अढळ ध्येयनिष्ठेचे, तेजस्वी विचारांचे, धीर गंभीर तत्त्व ज्ञानाचे, अतुल साहसाचे व मनोधैर्याचे यथार्थ प्रतिबिंब तीत पडलेले असल्यामुळे तिचे दर्शन अधिकच उदात्त व प्रभावी झाले आहे.

सावरकरांची महाकाव्यलेखनाची आकांक्षा पूर्ण झाली नाही. मराठी वाङ्मय त्याला मुकले. या गोष्टीचा खेद वाटणे स्वाभाविक असले तरी रास्त नाही. सावरकरांचे जीवन हेच एक महाकाव्य आहे. सर्व रसांनी नटलेले दिव्य व भव्य महाकाव्य. त्याचे प्रतिबिंब त्यांच्या कवितेत पडलेले आहे. रूढ अर्थाने सावरकरांनी महाकाव्य लिहिले नाही. पण त्यांची ही कविताच महान्काव्य आहे यात शंका नाही. ती महाराष्ट्राचं अमोल धन आहे. तिचा विसर महाराष्ट्राला कधी पडणार नाही. तिचा अभिमान त्याने सदैव बाळगावा.

विदर्भ साहित्य संघाचे वर्गणीदार व्हा.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भेट अशांची व्हावी

—प्रा. भास्कर कविमंडन

सावणाच्या फेसाचे फुगे करताना कधी कधी एखादा फुगा असा कांही थोरला होतो की, आसपासची रंगीबेरंगी सृष्टि त्यात परावर्तित होऊन गरगरु लागते ! क्षणभर आश्चर्य वाटते, अगदी सहज या फुग्याने इतक्या रंगांना पकडले कसे ? पण सहज क्रियातच असा वेधक रंगविलास सापडतो !

शब्दांचेहि असेच. शब्द आणि फुगे. तसा दोहोंच्या प्रकृतीत कांही विशेष फरक नाही ! भावना आणि विचार वाहून नेण्याचे हे आमचे माध्यम. पण अनेकदा ठेचाळते. नव्हे, ठेचाळतेच अधिक. जाता जाता कांही भावना सांडतात आणि जे दुसऱ्यापर्यंत पोचते, ते उरलेले.

पण कधी कधी या शब्दातहि रंग भरतात ! शब्द असे कांही जुळतात, की अर्थाला त्या रचनेत आपले पाऊल ठेवण्याचा अभिमान वाटावा !

कार्लाईलचे एक असेच साधे वाक्य...'दोन आणि फक्त दोनच माणसांबद्दल मला आदर वाटतो. एक तर, पोटाला भाकरी देणारा आणि दुसरा मानाला भाकरी देणारा...' कार्लाईलने सहज उच्चारलेल्या या शब्दात कसा गहन रंग भरुन राहिला आहे !

आमचे अनेक मित्र (?) आसपास असतात त्यांच्या होणाऱ्या भेटी त्यांच्याशी झडणाऱ्या सव्वा-कोस लांब गप्पा, नंतर पोटात उतरणारे कांही खमंग पदार्थ, या साऱ्या गर्दीत आम्ही इतके बुडलेले असतो की डोक्यात कधी विचार येत नाही की ही आसपासची माणसं मला खरंच आवडतात ? त्यांना मी आवडतो ?

असा प्रश्न टाकणं एक विक्षिप्तपणा आहे असे कांही म्हणतील. असा प्रश्न विचारणं फार धोक्याचं आहे, म्हणून कोणी सूज्ञ लाल कंदील दाखवतील. तर त्यातले पढिकविद्वान जरासे खोल वळण घेतील. खांदे उडवून म्हणतील "प्रेम ही विचार करुन जडविण्याची वस्तु नाही. फूल का उमलते ? प्रेम कां होतं ? हा निसर्ग आहे, निसर्ग..."(टाळ्या !)

हे तिसरे उत्तर फार धूर्तपणाचे आहे. एक रम्य सत्य वाह्यातपणे त्यात वापरले आहे. पण अशा धूर्त व्यक्तींनी थोडा अधिक विचार करावा, की खमंग गप्पा आणि पदार्थ देणारे आसपासचे लोक खरोखर प्रिय वाटतात का ?

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ह्या प्रश्न मात्र कांहींच्या दृष्टीने 'म्हणजे फारच हं !' संशय तरी किती घ्यावा माणसानं...? वास्तविक ह्या प्रश्न 'संशयी' नाही. समोर रेंगाळणारा प्लॅस्टिकचा मोती हा खरा मोती आहे का हा प्रश्न विचारणे संशयीवृत्तीचे चिन्ह आहे का ? नाही ना ? मग वरील प्रश्नहि संशयी नाही.

मी अशा अनेक खमंग बैठकीत सुट्टीचे दिवस फुकट घालविले आहेत. आणि अखेर शरद्बाबूंनी देवदासच्या तोंडी दिलेले उद्गार मला आठवले आहेत— देवदास सुन्न होऊन बोलतो— "कांही समजत नाही, लोक इकतं भराभर प्रेम तरी कसं करतात ? कुणी प्राणनाथ बनतो. कुणी प्राणप्रिया ! काय हे झटपट उरकणारे नाटक आहे !"

शरद्बाबूंचे हे उद्गार हताश वाटले तरी अत्यंत समर्पक आहेत. मी ज्या अनेक खमंग बैठकीत बसलो होतो त्यांची आठवण आज झाली की मलाहि असेच वाटते.

"काय लोकांना भराभर मित्र लाभतात ! किती गप्पा. किती हास्य ! तरीहि निंदा-नालस्ती ! काय लपवालपवीचे नाटक आहे !"

मी यांला लपवा-लपवीचे नाटक म्हणतो कारण ह्या साऱ्या खमंग बैठकी संपताच त्यातील सारे 'मित्र' मला निरनिराळ्या ठिकाणी एकेकट्याने भेटतात. व परस्परांच्या इतक्या उखाळ्या-पाखाळ्या काढतात की मी अगदी भांबावून जातो. ती खमंग बैठक, त्या लांब-लांब गोष्टी, ते गळ्यात अडकणारे गळे... अरे ती 'माया' आहे रे 'माया' ! नंतर शुद्ध-निंदा ! हेच सत्य ! हेच सत्य !

अशा या बैठकीत पोटाला खायला मिळते आणि डोके खाल्ले जाते. अशा या लोकांबद्दल कार्लाईलला काडीचाहि आदर वाटत नाही. कारण अशा ठिकाणी जे पदार्थ मिळतात ते असतात नासलेले. ज्या गप्पा मिळतात त्या असतात दंभाने माखलेल्या. कार्लाईल अशांना मान देणे शक्य नाही.

पण पोटाला भाकरी देणारे आणि मनाला भाकरी देणारे याशिवाय आणखीहि कांही लोक असतात का ? असतात.

हे लोक वरील प्रकारच्या बैठकीत कधीच नसतात. ते कुठेच नसतात. ते घरीच असतात ! अगदी ठेंगण्या, कोंदट घरी बसले असतात. बाहेर सूर्य पूर्वेला निघतो पण यांचा 'सूर्य' निघतो स्वतःच्या डोक्यातून ! निसर्गाचे वद्दल यांना कळतात रेडिओवरुन ! गांवच्या चळवळी यांना समजतात वर्तमानपत्रावरुन ! आसपास आग लागते, ती यांना कळते, पण यांना कळते तेव्हां ती विझली असते ! पूर येतो, तो याना कळतो पण यांना कळतो तेव्हां तो ओसरला असतो! असेहि लोक असतात. ज्याना स्वतःच्या पोटाशिवाय दुसरे पोट दिसत नाही.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्वतःच्या डोक्याशिवाय दुसरे डोके समजत नाही ! अशा असूनहि नसणाऱ्या लोकांविषयी कार्लाईलने कांहीहि अभिप्राय न देण्यात सूज्ञपणा दाखविला आहे. या पृथ्वीवरील साऱ्याच निर्जीव वस्तुविषयी माणूस अभिप्राय द्यावयास सज्ज झाला तर नुसती अनर्थक शब्दांची झुंबड उडायची !

कार्लाईलची दोन प्रकारची आदरणीय माणसं निराळीच आहेत. ती फार विरळ असतात. पण असतात हे मात्र निश्चित.

अशा थोर माणसाची जाणीव करुन घेण्याआधी एक आणखी वस्ताद लोकांचा थर नीट बाजूला करु या !

कधी मंदिरा समोर जा. एखाद्या वेळी दिसते की चांगल्या पांढऱ्या शुभ्र कपड्यातील लोक आजूबाजूच्या कंगालांना बोलावीत असतात. देवळासमोर बसलेली श्रीमंत बाई त्यांना पैसे देते, कांही धान्य मिळते. ते श्रीमंत जाहीर करतात "या ! मोठी थैली ढिली झाली आहे. दान घ्या, दान घ्या ! " ही घोषणा अजबच ! हे ऐकून भिकारी जमतात, आणि दान घेऊन जातात. जर कार्लाईल तिथे असता, तर त्याने देवा ऐवजी त्या बाईस प्रणाम केला असता का ? छे ! चुकूनहि असे समजू नका. कारण सारे दान करुन झाल्यावर त्या बाईची थैली जरी रिकामी झाली तरी गाल अभिमानाने आणीकच गोल-फुगरे झाले असतात. दानात असतो अभिमान ! 'मी रिकामे पोट भरले' ही खडखडीत जाणीव असते. असे 'दान' हे दान नसते. हा तर किफायतशीर सौदा असतो. कार्लाईल सौदेबाज लोकांना आदरणीय म्हणत नाही.

आणखी एक प्रकार जरा गंमतीदार असतो. पिठाची चक्की सुरु झाल्यावर तिच्यातून सारखे पडणारे पीठ जसे असते तसेच निरनिराळे विचार कांही लोक सतत सांडत असतात. आजच्या बोलल्या शब्दाची उद्या जाण नसते. आजच्या विचाराचे उद्या भान नसते. आवेश मात्र प्लेटो-ॲरिस्टॉटलचा असतो ! जगातील सारी उच्च तत्त्वे अगदी शुद्ध गाळून समोरच्या रिकाम्या डोक्यात नीट भरण्याची दक्षता असते. समोरच्या माणसास कांही 'विद्या' देण्याविषयी भयंकरच उत्साह असतो !

...'कम्युनिझम्ची तत्त्वे माहिती नाहीत ! ऐकून घे !'

'कला-विलास कळत नाही ! अरे लक्ष दे !'

'धर्माचे मर्म जाणले नाहीस ? टिपून घे !'

'लैंगिक प्रश्नांवर अडखळतोस ? हरकत नाही, शास्त्र समजून देतो !'

याप्रकारे साऱ्या वैचारिक, भावनिक व शारीरिक दोषांवरचो महान् 'हेमगर्भ' जणू यांच्या जवळ तयारच असते ! अशा सढळ हाताने ज्ञान देणाऱ्या सज्जनाचाहि कार्लाईल शिष्य होत नाही. अशा ज्ञानाच्या दुकानात नोकर राहणे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हवेच कशाला ? इथेहि अभिमानाची किंवा अभ्यासाची ऐट आहे. समोरच्या अज्ञानी काळोखास प्रकाश देण्याचा जुलूम आहे ! हा प्रकाश जो दिला जातो तो ज्ञान-ज्योत प्रज्वलित करण्यास नव्हे तर, "मी तुझ्या पेक्षा विद्वान आहे. कबूल कर ! शिष्य हो !", या प्रकारच्या दंभाची मशाल पेटविण्यास दिला जातो. 'मी आज एक रिकामे पोट भरले' किंवा 'आज मी एक रिकामे डोके भरले', ह्या दोनहि वृत्ति सारख्याच. कार्लाईल अशांना वंदन करीत नाही.

मग ज्यांच्यापुढे हात आपोआप जुळतील असे कोण ?

—'ज्यांच्या कडून पोटाला भाकरी मिळते, मनाला भाकरी मिळते, त्यांच्या-विषयीच फक्त आदर वाटतो'—

ऐन उन्हाळ्यात वळवाचा पाऊस आला की निसर्गापासून शीतल उल्हास मिळतो. पण उन्हाळ्यातील दुपारी वाळ्याच्या ताटीमधून येणारी विजेच्या पंख्याची झुळूक शीतलता देते.... ती पावसाची सर आणि ही झुळूक यांची तुलनाच नको.

आमच्या मनाला विचार 'देणारे' नकोत तर ज्यांच्या सहवासात विचार सहज मिळतील असे हवेत. विशाल ढगांपासून पाणी मिळते. ऋग्वेदहि तिथे नम्र होतो. पण आमचे गांवातील नळहि पाणी देतात. म्हणून काय वेदांनी नळ-सूक्ते तयार करावीत ? समोर एक केवीलवाणा माणूस बसला आहे. त्याला एक ओंजळ—पीठ आणि एक— चिमूट ज्ञान देऊन त्याच्या भूकेचे शमन तर होतच नाही पण माझ्या अहंकाराचे प्रज्वलन जरुर होते !

मदत, सहाय्य जे इतरांना करायचे, ते स्वतःचा मोठेपणा वाढविण्यास नको. एक सहज स्वभाव म्हणून जर करायचे असेल तर करा...

जी भाकरी भुकेल्यांची चाहूल लागल्यावर तव्यावर थापली जाते ती कार्लाईलला नको आहे. त्याला हवी आहे द्रौपदीची थाळी !

ज्यांचे ज्ञान मूर्ख माणूस समोर दिसल्यावर मग सरसर पुढे सरकते ते पण कार्लाईलला नको. जे ज्ञान नदीप्रमाणे सतत झुळझुळत असते ते त्याला हवे आहे! तहानलेल्याची जिथे धाव जाईल ती नदी !

म्हणूनच या जगात दोन आणि फक्त दोनच माणसं भेटावीत असं मना-पासून वाटतं. ज्यांच्या सहवासात साऱ्या अपेक्षा तृप्त होतात पण या तृप्तीची जाणीवहि त्यांना नसते ! ते देतात पण कुणी स्वीकारतात का ही फिकीर त्यांना नसते !

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

परिचय-परामर्श

दक्षिण दर्शन

लेखक-प्रा. मांडवकर प्रकाशक-सेवा प्रकाशन, अमरावती. किंमत चार रुपये.

'श्री शिवाजी लोक विद्यापीठाची' दक्षिण भारताची, ४०।४२ दिवसांची जंगी सहल झाली. त्यात श्री. मांडवकर हेहि होते. दक्षिण-दर्शन हे त्याच सहलीचे धावते व कांहीसे त्रोटक प्रवास वर्णन आहे.

मराठीत प्रवास लेखन गेल्या कांही वर्षांपासून सुरू आहे. त्याचे स्वरुपहि बदलते आहे. ते अधिक आकर्षक करण्याचा प्रयत्न सुरु आहे. पण वर्णनात असावा लागणारा काटेकोरपणा त्यात दिसत नाही. भूगोलाच्या पुस्तकात जशी एखाद्या गावा संबंधी आपण प्रसिद्धि वाचतो. तसाच कांहीसा प्रकार मांडवकरांच्या या 'दक्षिण दर्शनांत' झालेला दिसतो:- उ. हे गाव खेळण्यासाठी प्रसिद्ध आहे.

त्यांची ही रेल्वेची सफर होती. खास गाडी होती. गाडी जाता जाता किंवा मधेच कुठे थांबली असता त्या स्थळांचीहि वर्णने प्रा. मांडवकरांनी केलेली आहेत. ती कशाच्या आधारावर हे कळायला मार्ग नाही. प्रा. मांडवकरांनीहि तसा खुलासा आपल्या लेखनात केलेला नाही. त्यामुळे असे वाटू लागते की ही सगळी स्थळे रेल्वेस्टेशनाला लागूनच आहेत की काय ? जी जाता जाता किंवा अल्पावधीत पाहता येवू शकतात.

कांही स्थळांचे दर्शन प्रा. मांडवकरानी चांगले घडविले आहे. त्यावरून त्या स्थळांची योग्य अशी माहिती वाचकाला होते व त्या सोबतच तेथील जीवनाची सुद्धा कल्पना येते.- अशा ठिकाणी लेखकाची चिकित्सक वृत्ति व सूक्ष्म निरीक्षण प्रत्ययाला येते तर कधी 'असं असावं' असे तर्क त्यांनी केले आहेत. अर्थातच कांहीच माहिती मिळत नसेल तर तर्क करणे ठीकच. पण तसे घडल्याचे त्यांनी कुठेच नमूद केलेले नाही.

मद्रासेत त्यांना एक वृद्ध भेटला. त्याची म्हणून कांही वाक्ये त्यानी घातली आहेत व त्यावर स्वत: मतप्रदर्शन केले आहे. खरोखरीच त्या वृद्धाचे ते बोल होते काय ? कसे कळावे ? प्रा. म्हणतात त्याला मराठी येत नव्हते आणि प्रा. मांडवकरांना त्या वृद्धाची भाषा अवगत नव्हती मग हे वृद्धाचे भारदस्त बोलणे त्यांना कळले कसे ? याचा त्यांनी खुलासा केला नाही व तसे कांही न

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

करता थोडेसे खोचक असे मतप्रदर्शनहि केले. असे वाटू लागते की ते सगळे सत्य की लेखकाची निर्मिति?

भारतात दक्षिणेचा भाग अत्यंत प्रेक्षणीय असा आहे. दक्षिणेतील शिल्प तर प्रसिद्धच आहे. तेथील भव्य सुंदर अशी देवालयें श्री. मांडवकरांना खास सवलत मिळून पहायला मिळाली आहेत. तरी त्यांचा वेळेच्या बंधनावर आक्षेप आहे. त्यांना 'हर वक्तको खुला है मंदीर यह हमारा' असे पाहिजे आहे. कोणत्याहि बाबतीत विशिष्ट मर्यादेपर्यंत बंधनं असावी लागतातच हे प्रा. मांडवकरहि मान्य करतील.

या पुस्तकातील कांही शब्दप्रयोग अशुद्ध वाटतात. तसेच मुद्रणदोषहि बरेच राहिलेले आहेत. या दोन्ही गोष्टी अवश्य टाळल्या पाहिजेत.

एकंदरीत प्रा. मांडवकराचे 'दक्षिण दर्शन' बऱ्यापैकी आहे. प्रकरणांना त्यांनी सूचक शीर्षकं दिली असती तर ते अधिक आकर्षक झाले असते. वाचकांना हे प्रवास वर्णन मधून मधून रोचक वाटेल तसेच अनेक प्रवासेच्छूंना मार्गदर्शनपरहि ठरु शकेल. अशा प्रकारच्या प्रवास वर्णनांची गरज आहेच. प्रा. मांडवकरांनी वाचकांना दक्षिणेचे दर्शन घडवून त्यांच्या ज्ञानभांडारात भर टाकली याबद्दल त्यांचे अभिनंदन.

—व. मा. डाऊ

गुरुदेव रवींद्रनाथ टागोर

लेखक—श्रीकांत गोगटे जयहिंद प्रकाशन, मुंबई २. मूल्य ७५ न. पैसे

भारताची भूमि अलौकिक व चारित्र्यसंपन्न पुरुषांना जन्म देणारी आहे. अशा थोरांचा परिचय थोरांना तर असतोच पण तो बालांना देखील व्हायला पाहिजे. थोरांच्या जीवन चरित्रातूनच बालमनाला स्फूर्ति मिळायला हवी. तरुण पिढी विकसित व्हायला हवी या उद्देशाने महात्म्यांची चरित्रे लिहिली जातात. 'गुरुदेव रवींद्रनाथ टागोर' हे देखील त्याच उद्देशाने लिहिलेले चरित्र आहे.

श्रीकांत गोगटे यांनी बालवाचकांना हा स्फूर्तिचा ठेवा सादर केला आहे. त्यात सुरवातीच्या प्रकरणात गुरुदेवांच्या जीवन कार्याचा आढावा घेऊन नंतरच्या प्रकरणांत सविस्तर विवेचन केले आहे. अलौकिक व्यक्तिमत्व हे व्यक्तिगत तर असतेच पण त्यावर उदात्त संस्कार करणाऱ्या वातावरणाची, व व्यक्तींचीहि

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गरज असते. रवींद्रनाथांना स्फूर्ति देणारे त्यांच्या घराण्यातील आजोबांचे चारित्र्य, वडील व बंधू, भाचे, वहिनी वगैरे कौटुंबिक मंडळींची उत्साहवर्धक वागणूक यांचा त्यांच्या जीवनावर कसकसा परिणाम होत गेला व शालेय शिक्षणात विशेष न चमकलेले रवींद्रनाथ अंगभूत कल्पकतेच्या व विद्वत्तेच्या जोरावर कसे जगप्रसिद्ध झाले हेहि लेखकाने सहज व सुलभ भाषेत बालमंडळींना सांगण्याचा प्रयत्न केला आहे. रवींद्रनाथांचे अलौकिकत्व वर्णन करत असताना सामान्य लोकांना अशा गुणांची आवश्यकता आहे व ते साध्य करण्यासारखे आहेत असा लेखकाचा रोख आहे. व त्या दृष्टीने रवींद्रनाथांच्या जीवनातील बहुतेक महत्वाच्या घडामोडी व त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या सर्व गुणांचा फार थोडक्यात परंतु कौशल्य-पूर्ण परामर्श लेखकाने घेतला आहे.

रवींद्रनाथांच्या तत्कालीन राजकीय व सामजिक घडामोडीचं थोडंबहुत वर्णन करून बालवाचकांना लेखकाने आवश्यक ती माहितीहि पुरवली आहे. रवींद्र-नाथांच्या जीवनाचा बालमंडळींना उद्‌बोधक परिचय करून देण्यात श्री. श्रीकांत गोगटे यशस्वी होतील यात शंका नाही. त्यांनी रवींद्रनाथांच्या बालवाङ्मयातील निवडक लेख, कविता, चुटके किंवा गोष्टी यांचाहि परिचय लहान मुलांना करून दिला तर त्यांना तो जास्त आवडेल. रवींद्रनाथां-बद्दल त्यांना अधिक प्रेम वाटेल आणि उत्कृष्ट वाङ्मय मराठीत अनुवादित केल्याचं श्रेय श्री. गोगटे यांना मिळेल. त्यांनी तसा प्रयत्न करावा अशी त्यांना विनंति आहे.

—मन्दाकिनी कुलकर्णी

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"युगवाणी" (Yugwani) Regd. No. N 356

हे मासिक एम्. जी. सराफ यांनी नागपुर टाईम्स प्रेस, रामदासपेठ, नागपूर-१ येथे मुद्रित करून प्रा. श्री. मा. कुलकर्णी यांनी वि. सा. संघाकरिता, संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केले.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ